
लगंधव ...क

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय चरित्र
सं. क्र. ६१



REFBK-0001270

BHAVE & CO.
Thakurdwar, Bombay No. 2.

ॐ

प्रख्यात नट

# नारायण श्रीपाद राजहंस

ऊर्फ

# बालगंधर्व यांचें चरित्र.

REFBK-0001270

लेखक
"उद्योगीबाळ"

प्रकाशक—गणेश कृष्ण बोडस, मु० उमरावती, वऱ्हाड.

प्रकाशकानें सर्व हक्क स्वाधीन ठेवले आहेत.

आवृत्ती पहिली.

किंमत सहा आणे.

# मदीय हृद्गत

‘ बालादपि सुभाषितं ग्राह्यम्. ’

वस्तूला जशी छाया तशी ग्रंथाला प्रस्तावना ही असलीच पाहिजे अशी आमच्याकडे सर्व साधारण समजूत आहे. त्यांत एखाद्या पदवीधरानें किंवा एखाद्या मान्यवरानें प्रस्तावना लिहिली असेल तर मग त्या ग्रंथाची अपूर्वता कांहीं विचारायलाच नको. मग त्या ग्रंथाची थोरवी जाहीर करण्यास अनेक लेखण्या सज्ज होतात. आणि आर्थिक दृष्टीनेंही ही पद्धत फारच फायदेशीर होत असल्यामुळें ग्रंथकाराला आपल्या ग्रंथाला एखाद्या पदवीधरानें प्रस्तावना लिहावी असें वाटतें, व त्यासाठीं त्यांच्या घरीं त्याला वारंवार खेपा घालून व त्यांचीं आर्जवें करून कशीतरी आपली गरज भागवावी लागते. ही पद्धत पाश्चात्यांच्या इतर अनुकरणाबरोबर आम्हीं घेतली असल्यामुळें तिची युक्तायुक्तता पहाण्याचें कारणच नाहीं. पण माझ्या ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याकरितां एखाद्या पदवीधरास भीड न घालतां मी स्वतःच तें काम करण्याचें योजिलें आहे.

मला स्वताला नाट्यविषयाची प्रथमपासून फार आवड असल्यामुळें मी निरनिराळ्या देशांतील नाट्यविषयक ग्रंथांचें व परिस्थितीचें परिशीलन केलें आहे. शिवाय, कॉलेजमध्यें असतांना शेक्स्पियर, शिलर, टेनिसन वगैरे पाश्चात्य नाटककार वाचावयास मिळाले. तसेंच, गेल्या सुट्टींत विलायतेंतील नामांकित नटांचीं चरित्रें मी वाचून टाकलीं. तेव्हां पाश्चात्यांकडील नाट्यविषयक ग्रंथभांडार पाहून व या विषयाची

तिकडील भरभराट पाहून मलाही इच्छा झाली कीं, आपणही या बाबतींत कांहीं प्रयत्न करून पहावा. तिकडे जसे प्रख्यात नट ग्यारिक, सर हेनरी आयर्व्हिंग, एडमंड कीन, बेटरटन, अलेक्झांडर, एलनटेरी इत्यादि उदयास आले तशींच नटरत्नें आमच्याकडे सुद्धां आज चमकत आहेत व जेव्हां तिकडील नटांचीं चरित्रें मी वाचलीं तेव्हां आमच्या-कडीलहि सुप्रसिद्ध नटांचीं चरित्रें प्रसिद्ध करून नाट्यसेवा करावी असें मी ठरविलें; आणि त्याप्रमाणें गेल्या मे महिन्यांत महाराष्ट्राच्या अत्यंत आवडत्या नटाचें — बालगंधर्वांचें—चरित्र लिहिण्यास घेऊन मी तें शेवटासही नेलें. पुढें पुस्तक छापण्यास निघालों तों महायुद्धाची धोंड मधेंच आडवी आल्याकारणानें तें तसेंच कपाटांत कचरा खात पडलें होतें; नंतर माझे प्रियमित्र रा. रा. गणपतराव बोडस यांना मी तें वाचावयास दिलें असतां त्यांना तें फार आवडलें व त्यांनीं कांहीं उपयुक्त सूचनाहि केल्या; व तें छापून प्रसिद्ध करण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली. तेव्हां मीही आढेवेढे न घेतां त्यांना रुकार दिला. आणि आज परमेश्वर कृपेनें तें वाचकांना सादर करण्याचा हा सुप्रसंग प्राप्त झाला आहे. आणि हा प्रसंग आणून दिल्याबद्दल प्रियमित्र रा. बोडस यांचा मी फार आभारी आहें. वाचकांनीं ‘ पत्रं पुष्पं फलं तोयं ’ या न्यायानें माझ्या ह्या अल्पकृतीचा स्वीकार करावा अशी नम्र विनंति आहे. आणि महाराष्ट्रीयांस हा माझा प्रयत्न आवडून त्यापासून अल्प-तरी नाट्योन्नति झाली तर लौकरच ‘ हिंदुस्थानचा ग्यारिक ’ आणि ‘ पौर्वात्य आयर्व्हिंग ’ हीं दोन स्वकृत पुस्तकें महाराष्ट्रीयांस अर्पण करण्याचें नियोजिलें आहे.

शांतिनिकेतन; ग्वाल्हेर.<br>
अक्षयतृतीया १८३८.<br>
५ मे १९१६ इसवी.

‘ उद्योगीवाळ. ’

# भूमिका.

## दुर्लभं भारते जन्म । मानुष्यं तत्रदुर्लभं

जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांच्या प्रत्येक शर्यतींत आमचा भारतवर्ष त्यांच्या बरोबर धांवत आहे यांत संदेह नाहीं. निरनिराळ्या उद्योगधंद्याची, कलाकौशल्याची, शास्त्रीयज्ञानाची आणि भौतिक सुधारणांची वाढ तिकडे झपाट्यानें होत असून उशिरानें कां होईना आम्हीहि त्यांच्या बरोबरीनें धांवण्याचा प्रयत्न करीत आहोंत, याची साक्ष जगाचा इतिहास आज पटवीत आहे. आतां त्या राष्ट्रांच्या हातांत हात घालून ही शर्यत चालविण्याचें जरी आमच्यांत आज सामर्थ्य नसलें तरी अल्पावधींतच ही शर्यत आम्ही खात्रीनें जिंकणार अशी आशा करण्यास जागा आहे.

पाश्चात्य राष्ट्रांनीं अनेक कलांबरोबर नाट्यकलेचीहि जोपासना करून तिचें संवर्धन करण्याकरितां अनेक संस्था स्थापून जोमानें परिश्रम चालविले आहेत. समाजास नाट्यकला ही आवश्यक गोष्टींपैकीं एक आहे असें वाटूं लागून नाट्यकलेसंबंधीं त्यांची वाढती सहानुभूति दृग्गोचर होऊं लागली आहे. नाट्यकलेला राष्ट्रीय बनविण्याकरतां तिकडील समाजधुरीण नाट्यप्रेमी सद्गृहस्थ एकदिलानें झटत आहेत. निरनिराळे नाट्यग्रंथप्रसिद्ध करून समाजाला नाट्यविषयाच्या अंगप्रत्यंगाची ओळख करून देणें; नाट्यविषयाची चर्चा सतत चालू रहाण्याकरतां आणि नाट्यविषयाची समाजांत जागृती उत्पन्न होण्याकरतां नाट्यविषयक वृत्तपत्रें व मासिकें चालविणें; नामांकित नटनट्यांचीं व नाटककारांचीं बोधप्रद व मनोरंजक चरित्रें प्रसिद्ध करून नट व समाज यांचें

एकीकरण करणें आणि नाट्यकला ही मनोरंजक व राष्ट्रीयशिक्षण संवर्धक कला आहे हें राष्ट्राच्या निदर्शनास आणून देण्याकरितां लेखांच्याद्वारें, व्याख्यानांच्याद्वारें, संभाषणांच्याद्वारें व ग्रंथांच्याद्वारें नाट्यकलेचें महत्त्व समजावून देण्याचें महत्कार्य तिकडील नाट्यकलाहितेच्छु सद्‌गृहस्थांनीं चालविलें असून, त्यांचें कार्य बऱ्याच अंशीं सिद्धीस सुद्धां गेलें आहे.

आमच्याकडे देखील नाट्यकलेच्या प्रगतीचे थोडेफार प्रयत्न ( रंगभूमिमासिक, नाट्यसंमेलन, भारतनाट्यसमाज इ० ) होत आहेत ही समाधानाची गोष्ट होय. परंतु सध्यांच्या काळीं एवढ्याच प्रयत्नांनीं भागावयाचें नाहीं. कारण, सुधारलेलीं राष्ट्रें मृगगतीनें चाललीं असतां हिंदुस्थान जर गोगलगाईच्या गतीनें चालत राहील तर त्याला कल्पांतापर्यंतहि इतर राष्ट्रांना गांठतां येणार नाहीं. त्यासाठीं हल्लींपेक्षां मोठ्या प्रमाणांत व शहरोंशहरीं नेटानें प्रयत्न झाले पाहिजेत. आतां विलायतेंतील नाट्यकलेच्या सुधारणेइतकी जरी आमची नाट्यकला सांप्रत सुधारलेली नसली तरी तिची प्रगती बरीच आशाजनक आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

तिकडे शेक्स्पियर, जॉन्सन्, शिलर, गेटी, गोल्डस्मिथ् वगैरे नामांकित नाटककार होऊन गेले आहेत, तर आमच्याकडे सुद्धां कविकुलगुरु कालीदास, भवभूति, शूद्रक इत्यादि प्राचीन नाटककार आणि अलीकडील कै० श्री. आण्णासाहेब किर्लोस्कर, रा. देवल, रा. खाडीलकर, रा. कोल्हटकर वगैरे विख्यात नाटककार वरील विलायती नाटककारांच्या तोडीचे झाले आहेत. तसेंच, तिकडी सुप्रसिद्ध नट ग्यारिक, सर हेनरी आयर्व्हिंग, एडमंड कीन, बीर बूह्‌म ट्री, एलनटेरी इत्यादि नटनट्या जशा आंग्ल रंगभूमीस भूषणभूत झाल्या आहेत

त्यांच्याच तोलाचे आमच्याकडेहि प्रसिद्ध अभिनयपटु रा. गणपतराव जोशी, कै० वा. श्री. गणपतराव भागवत, कै० वा. श्री. भाऊराव कोल्हटकर, कै० वा. श्री. बळवंतराव जोग, प्रस्तुत चरित्रनायक इत्यादि महाराष्ट्र रंगभूमीचीं आभूषणें असलेलीं नटरत्नें आमच्या हिंदभूमींत उदयास आलीं आहेत. सारांश, कोणत्याही बाबतींत हिंदराष्ट्र पाश्चात्यांच्या मागें नाहीं हें यावरून सिद्ध होतें; असो.

कोणत्याही राष्ट्राची उन्नति अजमावून पहावयाची असली ह्मणजे त्या राष्ट्राच्या नैतिक, धार्मिक, भौक्तिक, आर्थिक व शिक्षणविषयक गोष्टींबरोबर त्या राष्ट्रांतील मनोरंजनाचे प्रकार व करमणुकी यांचें निरीक्षण करून राष्ट्राच्या उन्नतीचा अगर अवनतीचा निर्णय ठरवावयाचा असतो. राष्ट्रांतील लोक चैनींत व विलासांत कितपत दंग आहेत हें दिग्दर्शीत होण्याकरतां देशांतील मनोरंजन संस्थांनीं वारंवार आपला आढावा समाजापुढें मांडला पाहिजे. व याचसाठीं नाटक मंडळयांचा इतिहास, त्यांच्या घडामोडी, नाटकविषयक निरनिराळे ग्रंथ, सुप्रसिद्ध नाटककारांचीं व नटांचीं मनोरंजक चरित्रें, मधूनमधून प्रसिद्ध करणें हें राष्ट्रांतील नाटकमंडळयांच्या व नाट्यकलेच्या हितेच्छूंचें अवश्य कर्तव्य होय. आणि ह्मणूनच महाराष्ट्राच्या अत्यंत आवडत्या अशा पुरुषाचें हें मनोरंजक व हृदयंगमजीवनचरित्र बहुजनसमाजास अर्पण करून वाङ्मयसेवा, नाट्यसेवा आणि महाराष्ट्रसेवा अशा तीन हेतूंची पूर्तता एकाच वेळीं करून घेण्याचें आम्ही योजिलें आहे.

सुधारलेल्या देशांत प्रसिद्ध नटांचीं विविध माहितीनें भरलेलीं स्पृहणीय चरित्रें नित्य प्रसिद्ध होत असतात. व त्यामुळें त्या नटांच्या विषयींची लोकांची जिज्ञासा, प्रेम आणि सहानुभूती वृद्धिंगत होऊन नट व समाज यांच्यांत एकीकरण होतें आणि समाजांतील नटांची जागा

बऱ्याच वरच्या पायरीस जाऊन पोंचते. परंतु असे प्रयत्न आमच्याकडे-निदान महाराष्ट्रांत तरी—मुळींच होत नाहींत ही खेदाची गोष्ट होय. आमच्याकडे एखादा सुप्रसिद्ध नट वारला तर त्याच्या संबंधीं दोन शब्द लिहिणें आमच्या वृत्तपत्रांना आणि मासिकांना कमीपणाचें वाटतें. बरें, दुसऱ्या एखाद्यानें दोन ओळी लिहून पाठविल्या तर त्या छापण्याचेंही त्या बिचाऱ्यांच्या जिवावर येतें.* सारांश, समाजास अझूनही नाट्यविषय सवतीच्या मुलाइतका त्याज्य वाटत आहे. नाहीं ह्मणावयास कांहीं कांहीं मासिककर्ते विद्वान लेखकांनीं लिहिलेले नाट्यविषयावरील लेख केव्हां केव्हां प्रसिद्ध करतात आणि नाट्यविषयक ग्रंथही आमच्याकडे मधून मधून प्रसिद्ध होत असतात; परंतु नाट्यविषयक चारित्रग्रंथ मात्र किर्लोस्कर मंडळीच्या उत्साही व धोरणी सेक्रेटरींनीं १०।१५ वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेलीं कै० वा. श्री० आण्णासाहेब आणि कै० वा. श्री. भाऊराव कोल्हटकर यांचीं चरित्रें वगळलीं असतां गेल्या पंचवीस वर्षांत ह्मणजे पावशतकाच्या अवधींत आमच्याकडे एकहि चरित्रग्रंथ प्रसिद्ध झाला नाहीं हें परम आश्चर्य नव्हे काय ?

विलायतेंत एखादा नट जरा प्रसिद्धीस आला कीं, त्याच्या संबंधी बारिक सारीक माहिती गोळा करून त्याचें मनोरंजक जीवनचरित्र एखाद्यानें प्रसिद्ध केलेंच ह्मणून समजावें. आणि त्यामुळेंच आज 'Sir Henry Irving, Life of Garrick, Representative Actors, Actor's Livies, British Stage' इत्यादि इत्यादि, तिकडील नटांचे चरित्रग्रंथ आंग्ल वाङ्मयभांडारांत आपणांस पहावयास सांपडतात. आमच्या महाराष्ट्रांत आतांपर्यंत कितीतरी अद्वीतीय नटरत्नें होऊन

---

* सु. नट दत्तोपंत हल्याळकर यांचे निधनाचे वेळीं प्रस्तुत लेखकानें एक मृत्युलेख लिहून ज्ञानप्रकाश वगैरे पत्रांकडे पाठविला होता. पण त्याला केराची टोपली दाखविण्यांत आली असा तर्क आहे; कारण तो प्रसिद्ध झाला नाहीं.

गेलीं आहेत; कितीतरी नटांनीं नाट्यकलेचें भाग्य वाढविलें आहे आणि किती तरी नट चरित्रनायक होण्यास पात्र झाले आहेत; परंतु त्यांचीं चरित्रें लिहिणारा एकही नाट्यसेवक महाराष्ट्रांत निघूं नये हें नवल आहे !

प्रस्तुत चरित्राचा नायक मोठासा लोकनायक नाहीं, त्यानें कुठें शिवाजी अगर नेपोलियनप्रमाणें तरवार गाजविली नाहीं किंवा जगांतील वाङ्मयास भूषणभूत होऊन अजरामर झालेला गीतारहस्य किंवा गीतांजली या सारखा एखादा अलौकिक ग्रंथहि त्यानें लिहिलेला नाहीं; मग त्यांचें चरित्र लिहिण्याचा हा एवढा उपद्व्याप कशाला ? असा कित्येकांकडून प्रश्न येण्याचा संभव आहे. तर त्यांना आम्ही येथें एवढेंच सांगून ठेवतों कीं, आमचा चरित्रनायक जरी शिकंदराप्रमाणें सारें जगत् जिंकून आणखी देश जिंकण्यास नाहीं ह्मणून रडला नसला, त्यानें कोलंबसाप्रमाणें जरी अमेरिकेसारखें अज्ञातखंड शोधून काढलें नसलें, त्याच्या हातून नेपोलियनप्रमाणें आपल्या देशास स्वातंत्र्य मिळवून देण्याचें अद्भुत कार्य झालें नसलें किंवा साक्रेटिसाप्रमाणें यद्यपि त्यानें स्वर्गलोकीचें तत्त्वज्ञान भूलोकीं आणलें नसलें तरी चरित्र विषय होण्याइतकी पात्रता त्याच्या अंगीं खास आहे. वरील थोर थोर पुरुषांप्रमाणें जरी त्यानें कोणतेंच अद्भुत कार्य केलें नसलें तरी त्यानें आपल्या अंगच्या अद्वितीय गुणानें महाराष्ट्रांस मोहून टाकलें आहे यांत संशय नाहीं. महाराष्ट्राच्या मनोभूमीवर आमच्या चरित्रनायकानें कायमचें अधिष्ठान केलें आहे ही गोष्ट निर्विवाद होय. तसेंच त्याच्या मधुर गानवृष्टीनें तृषितचातकासम महाराष्ट्र तल्लीन होऊन निरामय आनंदांत दंग होऊन जातो हें सिद्ध करण्यासहि दुसऱ्याच्या साक्षीची गरज नाहीं. इतकेंच नाहीं तर महाराष्ट्रावरोबर अखील हिंदुस्थानांतील व परदेशस्थ

रसिक सुद्धां आमच्या चरित्रनायकाच्या अमोलिक गुणाचा लाभ फोनोग्राफच्या द्वारें मनमुराद घेत असून त्यांनाहि त्यापासून आनंद व कौतुक वाटत आहे हीच गोष्ट त्याच्या लोकप्रियतेची व पात्रतेची उत्तम साक्ष पटविणारी आहे. आणि कै० वा० विद्वद्रत्न श्री० विष्णु-शास्त्री चिपळुणकर यांचा महाराष्ट्रास जितका अभिमान आहे, निबंध-माला व गीतारहस्य यांचें वाचन महाराष्ट्रास जितकें प्रिय आहे, केसरी वाचावयास महाराष्ट्र जितका हपापलेला असतो, लोकमान्य टिळकांचें वक्तृत्व महाराष्ट्रास जितकें अपूर्व आणि आनंददायी वाटतें, दे० दादासाहेब खापर्डे यांचें विनोदप्रचूर भाषण ऐकण्यास महाराष्ट्र जितका उत्सुक असतो, तितकीच उत्सुकता, तितकाच अभिमान, तितकेंच प्रेम व तितकीच सहानुभूति आमच्या चरित्रनायकाच्या संबंधींहि महाराष्ट्री-यांकडून नित्य दाखविण्यांत येते; आणि ह्मणूनच महाराष्ट्राच्या अत्यंत आवडत्या अशा या पुरुषाचें व सर्वमान्य नटरत्नाचें मनोरंजक व हृदयंगम जीवनचरित्र अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें असल्यामुळें आज आम्ही महाराष्ट्रास सादर करीत आहोंत.





बालगंधर्व.

ॐ

# बालगंधर्व यांचें चरित्र

All the world is a stage And all the men and women are merely Actors; *Shakespeare.*

## जन्म व बालपण.

ज्या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडांत जन्मास येऊन ज्या प्रख्यात नटांनीं आंग्ल रंगभूमीवर प्रवेश केला व आपल्या अपूर्व नाट्यकौशल्यानें पाश्चात्य नाट्यसृष्टींत विलक्षण क्रांती घडवून आणिली त्याच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तर-कालांत महाराष्ट्रांत जन्म घेऊन ज्या कित्येक नटांनीं मराठी रंग-भूमीचे पांग फेडले व आपल्या अंगच्या अद्वितीय नाट्यगुणांनीं भारतीय नाट्यसुंदरीच्या भव्य निटीलाकाशावर सौभाग्याचा कुंकु-मातिलक लावून तिला सनाथ केली त्या नटरत्नांत आमच्या चरित्रनायकाची प्रामुख्यानें गणना करणें जरूर आहे. आणि ज्या सर्वांगसुंदर नाट्यदेवतेस समाजानें आपणापासून दूर लोटलें होतें त्या देवतेला आपल्या कोमल करांनीं धरून समाज सिंहासना-वर अधिष्ठीत करण्याचें पुण्य ज्या कांहीं नाट्यभक्तांनीं संपादिलें त्यांत आमच्या चरित्रनायकाचा बराच वांटा आहे. आणि महा-

क्वा शेक्स्पियरची प्रतिभासंपन्न नाटकें निबिड अंधकारांतून स्वच्छ प्रकाशांतून आणून बहुजन समाजापुढें त्यांचें प्रदर्शन करून लोकांकडून स्वतांला धन्य धन्य म्हणवून घेणारा विख्यात नट **ग्यारीक** किंवा आपल्या अनुपम अभिनय नैपुण्यानें युरोपास व अमेरिकेस थक्क करून सोडून नाइटची पदवी धारण करणारा थोड्याच दिवसांपूर्वीं ख्रिस्तवासी झालेला **सर हेनरी आर्यव्हिंग** या जोडीनें जशी विलक्षण लोकमान्यता संपादून युरोपांत नाट्य-विषयक चळवळ केली तशीच लोकप्रियता व तशीच नाट्यक्रांती आमच्या चरित्रनायकानें महाराष्ट्रांत केली आहे. आणि **ग्यारीक** आणि **आर्यव्हिंग** ही जोडी जशी युरोपियनांना ममत्व व आपले-पणा दाखविते तशीच ममत्वबुद्धी महाराष्ट्राची **बालगंधर्वांच्या** ठिकाणीं आहे.

एकोणिसाव्या शतकाचा उत्तरकाल म्हणजे महाराष्ट्रांत विलक्षण चळवळीचा, घडामोडीचा व नूतन परिस्थितीचा जनक झाला. या काळांत शिक्षण, ज्ञानवर्धन, उद्योगधंद्यांची वाढ, वाङ्मय वगैरेंची भरभराट, इत्यादि गोष्टी महाराष्ट्रांत झाल्या. आणि अशा चळवळीच्या काळांतच इ. स. १८८८ सालीं म्हणजे ज्यावेळीं महाराष्ट्रांत कै० अण्णासाहेबांच्या उच्चप्रतीच्या संगितांनीं युक्त असलेल्या नाटकांनीं नाट्यकलेची सुधारलेली आवृत्ती काढ-ण्यास प्रारंभ केला होता, सर्व महाराष्ट्र नूतन संगितानें ' वेडावूनी गेला होता. ' केसरीच्या गर्जनेनें नाटकांची उपयुक्तता व नाट्य-कलेचें श्रेष्ठत्व लोकांस निवेदन करून नाट्यद्वेष्ट्या मंडळीचा दुरा-

ग्रह लुप्त होऊं लागला होता, आणि सर्व महाराष्ट्र नाटकें पहावयास उत्कंठित झाला होता अशा वेळीं महाराष्ट्राच्या पुण्यभूमींत, थोरल्या बाजीरावांनीं आलंकृत केलेल्या व पेशव्यांच्या राजधानीच्या शहरीं, पुण्यपत्तनीं १८८८ इसवी म्हणजे शके १८१० या वर्षी आमच्या चरित्रनायकाचा जन्म झाला.

ह्या बाळानें या जगद्रंगभूमीवर प्रवेश करून आपल्या बाल आवाजींत पहीलीच किंकाळी फोडून आपल्या आगमनानें आईबापांस तोषविलें, आणि राजहंसांच्या घराण्यांत जन्म घेतलेल्या ह्या ' राजहंसा 'नें जसें आपल्या चारुतर बाललीलांनीं व अनुपम सौंदर्यानें आपल्या जनक जननीस नित्य सुखविलें तसेंच आज तो सर्व महाराष्ट्रालाहि आपल्या विविधलीला व अद्वितीय गायनपाटव दाखवून चकीत करीत आहे. रुढीनियमाप्रमाणें त्याचा नामकरणविधी होऊन जोशीबुवांनीं बाळाची पत्रिका तयार केली व बाळाचें नारायण नांव ठेवण्यांत आलें. आम्ही प्रस्तुत चरित्रग्रंथांत आमच्या नायकाच्या नांवांत जसजसें स्थित्यंतर होत गेलें आहे, त्या त्याप्रमाणें नारायण, नारायणराव व बालगंधर्व असेंच त्यांना संबोधणार आहोंत, हें येथें सांगणें जरूर आहे.

नारायणाच्या वडलांचें नांव श्रीपादराव आणि आईचें नांव अन्नपूर्णाबाई असें आहे. श्रीपादराव हे देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण असून त्यांना पुण्यास इरिगेशन खात्यांत नोकरी होती. पण त्यांना कांहीं अपघात झाल्यामुळें सांप्रत ते पुण्यास घरींच असतात. श्रीपादरावांना एकंदर तेरा अपत्यें होतीं. परंतु निर्घृण-

कालाच्या तडाक्यांतून वांचलेलीं तीन मुलगे व एक मुलगी अशीं चारच अपत्यें आज हयात आहेत. त्यांपैकीं वडील मुलगा पुण्यास आपल्या वडिलांच्याजवळ असतो; दुसरे आमचे चरित्र नायक; तिसरे व्यंकटेश ऊर्फ बापुराव हे सुप्रसिद्ध महाराष्ट्र मंडळींत मुख्य नायिकेच्या जागेवर असतात. यांच्याविषयीं जास्त वर्णन पुढें येणारच आहे. आणि चवथी मुलगी आपल्या सासरीं संसारसुख अनुभवीत आहे. अशी नारायणाच्या भावंडांची हकीगत आहे. नारायणाचे वडील-मातोश्री धर्मशील, श्रद्धाळु, सद्गुणी, उत्तम कुलशीलवान व सदाचारी असल्यामुळें या गुणांचें नारायणाच्या मनोभूमींत बालपणींच बीजारोपण केलें गेलें. आणि याच गुणांचें बाळकडू त्यांच्या मातेनें त्यांना पाजलें असल्याकारणानें आज तागायत त्यांचें चरित्र मलीन होण्यासारखें एकही अनन्वीत कृत्य त्यांचे हातून झालेलें नाहीं. 'इतर मुलांप्रमाणें नारायणाचें बालपण खेळण्यांत, आईच्या मांडीवर लोळण्यांत, वडीलांची देवपूजा उधळून टाकण्यांत आणि त्याबद्दल वडीलांनीं तोंडांत दिलेल्या खाऊनें रडून आकांत करण्यांत आणि नंतर वडीलांनीं देवाचा नैवेद्य देतांच पुन्हां आनंदानें आईकडे धांव घेण्यांत गेलें. अशा रीतीनें नारायणाचें तीन चार वर्षें पावेतों आयुष्य लोटल्यावर नारायणास एका पाडव्याच्या मुहूर्तावर शाळेंत घालण्यांत आलें.'

श्रीपादरावांना गायनवादनाचा, सतार वाजविण्याचा व पहाटें उठून सतारीच्या सुरावर मधुर भूपाळ्या, धर्मपर पद्यें व श्लोक म्हणून भजन करण्याचा नाद असल्यामुळें नारायणास बाळपणींच

गायनाचें बाळकडू पाजण्यांत आलें. नारायण तीनचार वर्षांचा झाला तेव्हांपासूनच तो वडीलांच्या समोर बसून आपल्या मधुर बालआवाजींत व बोबड्या शब्दांत सुंदर सुंदर भूपाळ्या व श्लोक म्हणून मातापित्यांना संतोषवूं लागला. आणि हाच त्याचा लहानपणीचा गायनकलेचा ‘ ओनामा ’ होऊन बसला व त्यामुळें शाळेंतल्या ‘ श्रीगणेशा ’ ला अर्थातच अर्धचंद्र मिळाला. नारायणाच्या त्या सुंदर मुखाकडे व त्याच्या बालक्रीडाकडे पाहून श्रीपादराव व अन्नपूर्णाबाई यांनां स्वर्गीय आनंद होऊन त्या उभयतांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वहात. पुढें चांगल्या नांवारूपास आलेल्या थोरपुरुषांचीं बाळपणचीं चरित्रें तितकीं कांहीं महत्वाचीं नसतात असा नियम आहे व त्यास अनुसरून आमच्या चरित्रनायकाचें बाळपणहि फारसें महत्वाचें व तितकें मनोरम नाहीं. परंतु मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात म्हणतात त्याप्रमाणें नारायणाच्या भावी गुणज्ञतेचा व त्याच्या कीर्तिवृक्षाचा लहानसा अंकूर त्याचे बाळपणींच दृष्टीगोचर होऊं लागला होता. आणि श्रीशिवाजीचें बाळपण जसें समशेर चालवण्यांत गेलें, नेपोलियनच्या शौर्य भानूचे अस्पष्ट कीरण त्याच्या बालवयांतच जसे चमकूं लागले, आद्य श्रीमच्छंकराचार्यांच्या विद्वत्तेची झांक ज्याप्रमाणें त्यांच्या बाळपणींच समाजचक्षूस दिसून आली, त्याचप्रमाणें नारायणाच्या कर्णमधुर व मनोल्हादक गायनाचे अस्पष्ट ध्वनी त्याच्या बालवयांतच महाराष्ट्राच्या कर्णरंध्रांत घुमूं लागले होते. याचवेळीं श्रीपादरावांची बदली मालेगांवास झाल्याकारणानें

नारायणास जळगांवास त्याचे आते मेव्हणे रा. रा. आबासाहेब म्हाळस रहात असत त्यांच्या येथें शिकण्याकरितां ठेवण्यांत आलें.

रा. म्हाळस हे जळगांवास एक प्रसिद्ध वकील असून जळगांव मुन्सीपालटीचे ते चेअरमन आहेत. शिवाय, जळगांवच्या पुढाऱ्यांपैकीं ते एक आहेत; त्यामुळें जळगांवास येणाऱ्या नाटकमंडळ्यांचा व आबासाहेबांचा स्नेहसंबंध असे. शिवाय खुद्द रा. आबासाहेबांना गायनाची अत्यंत आवड असल्यामुळें त्यांच्या घरीं गवयांचें व नाटक मंडळ्यांचें येणें जाणें असे; त्यामुळें अनायासेंच अनेक नाटकप्रयोग आणि बरींच गाणीं नारायणास ऐकावयास सांपडत. आणि त्यामुळें त्याची गाण्याची आवड जास्त वृद्धींगत होऊं लागली. गाण्याकडेच तो आपलें सारें लक्ष देऊं लागल्याकारणानें त्याच्याकडून सरस्वतीची सेवा नीटपणें होईनाशी झाली. परंतु शाळेंतील शिक्षणाकडे त्याचें जरी दुर्लक्ष झालें होतें तरी गायनासारखा सर्वोत्कृष्ट गुण पैदा करण्यांत त्यानें तें सव्याज भरून काढल्यामुळें नारायणाच्या आईबापांना आणि आबासाहेबांनाहि त्यांतल्यात्यांत समाधान वाटलें.

नारायण आबासाहेबांच्या घरीं राहून जळगांवच्या एका मराठी शाळेंत शिकत असे. शिवाय त्याचा गायनाचाहि अभ्यास सुरूच होता. त्यानें आपल्या प्रेमळ वर्तनानें व लीनतेनें अल्पावधींतच शिक्षकांचें व सहाध्यायि यांचें प्रेम संपादन केलें. यावेळीं सर्वांच्या तोंडीं शाळेंत नारायण झाला होता. शाळेमध्यें एखाद्या

बक्षिस समारंभाचे वेळीं अगर एखाद्या अधिकाऱ्यास पानसुपारी देण्याच्या प्रसंगीं पदें म्हणण्याचें काम नारायणाकडेच असावयाचें! आणि अशा प्रसंगीं नारायणानें आपल्या मधुर कोमल आवाजीनें श्रोत्यांना तल्लीन करून सोडावें आणि समारंभाची शोभा वाढवावी. आणि याबद्दल त्याला अनेक मोठमोठ्या अधिकाऱ्यांकडून पुष्कळ वेळां प्रोत्साहन व बक्षिसें मिळत. नारायणाच्या ह्या अत्युत्तम गुणामुळें व त्याच्या निरलस, निष्कपट, गरिब, प्रेमळ व वीनयशील वर्तनामुळ शाळेंतील लहान मुलापासून हेडमास्तरपर्यंत व गांवांतील बालापासून वृद्धापर्यंत सर्वांना नारायणाचें कौतुक वाटें व त्याच्याविषयीं त्यांच्या मनांत प्रेम उत्पन्न होई. आणि नारायणाशीं आपली मैत्री जमावी म्हणून शाळेंतील मुलांमध्यें अहमहमिका लागत असे. नारायणाच्या या वाढत्या लौकीकानें शाळेंतील कित्येक मुलांना जरी त्याचा हेवा वाटे तरी नारायणास प्रत्यक्ष रीतीनें कांहीं दु:शब्द बोलण्यास त्यांची जीभ धजत नसे व त्यास शारीरिक पीडा देण्यासहि त्यांपैकीं कोणाचा हात उचलत नसे, इतकें नारायणाचें त्यांच्यावर वजन असे अगर त्याच्या सर्वोत्तम गुणामुळें ते दिपून जात असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं.

मा।\
'हंस' व
गुणभिन्नत्व स्पष्टच
श्याच्या जोरावर हंसाश।

———

# बालगंधर्व पदवी मिळते.

" There is a tide in the affairs of men "

*Julius Ceasar*

मागील प्रकरणांत नारायणाचा लौकिक जळगांवांत कसा वाढूं लागला व त्याचें सर्वत्रांना कसें कौतुक वाटे हें निवेदन केलें. नारायण आबासाहेबांच्या घरीं शिकत असे आणि गवयांचें गाणें ऐकणें व नाटकें पहाणें हा त्याचा क्रम चालू होता. त्याला पहिल्याप्रथम नाट्यकलाप्रवर्तक मंडळीची प्रेमगुंफा, विकल्पविमोचन इत्यादि नाटकें पहावयास सांपडलीं. व त्यांचा त्याच्या मनावर बराच परिणाम झाला. त्यानंतर त्यानें किर्लोस्कर मंडळीचीं शाकुन्तल, सौभद्र, वीरतनय हीं शास्त्रशुद्ध संगीत नाटकें पाहिलीं. हीं पाहिल्यापासून त्याच्यावर पूर्वीपेक्षां कांहीं विलक्षण परिणाम झाला. व या मंडळीविषयीं त्याच्या मनांत अभिमान उत्पन्न झाला.

त्या वेळच्या मराठी क्रमिक पुस्तकांतील एका पुस्तकांत एका मुलानें झाडाचें फूल तोडलें व त्याबद्दल त्याचा बाप त्याला रागें भरला, अशा अर्थाची एक गोष्ट होती; तिच्यावर त्या ... तले रा० बाबा मास्तर यांनीं एक चुटका रचला. तेनं अल्पा-नारायणानें काम केलें व तें फारच चांगलें संपादन केलें. यावेळीं त्याला बक्षिसहि मिळालें. बाल आ... होता. शाळेमध्यें एखाद्या

वर्तन यामुळें नारायण सर्वांना हवासा वाटे. कोणीहि त्याला पदें म्हणण्यास सांगी व नारायणहि कोणाचा हिरमोड करीत नसे. झटकन एखादें पद म्हणून मोकळा होत असे व त्यामुळें लोकांना त्याचा फार लळा लागला होता. मेजवानीच्या वेळीं श्लोक म्हणणें व शाळेंत कविता म्हणणें वगैरे हटकून नारायणाकडे असावयाचें व त्या त्या वेळीं त्यानें तत्पर राहून आपल्या गोड आवाजानें श्रोत्यांना खूष करून टाकावें.

नारायणाला गाण्याची आवड आहे व गाणें शिकण्याची इच्छा आहे असें पाहून श्रीपादरावांनीं त्याच्या गाणें शिकण्याची व्यवस्था केली. दिल्लीचे महिबूबखां या नांवाचे कोणी एक उत्तम मुसलमान गवई जळगांवास रहात असत. त्यांना कांहीं वेतन देऊन त्यांच्या जवळ गाण्याचें शिक्षण संपादण्यास नारायणाला ठेवून दिला. गाणें शिकण्याची उत्कट इच्छा, आवाजांत नैसर्गिक कोमलता आणि गुणग्रहण करण्यास पूर्ण तत्पर अशा तऱ्हेचा संपूर्ण योग जुळून आल्यामुळें तो भराभर गायनकलेच्या एक एक पायऱ्या चढूं लागला. अशा रीतीनें सुमारें तीन वर्षें आपल्या गुरूंजवळ गायनकलेचें शास्त्रोक्त ज्ञान त्यानें संपादित केलें. नारायणानें शाळेंतील अभ्यासाकडे जरी दुर्लक्ष केलें होतें तरी नियमीत अभ्यास करून तो प्रत्येक परीक्षेंत उत्तीर्ण होत असे. अशा 'हंस' व [illegible] पांच इयत्ता होऊन इंग्रजी पहिल्या इयत्तेपर्यंत या गुणभिन्नत्व स्पष्टच गांठली होती. मध्यंतरी मे महिन्याच्या सुटींत श्याच्या जोरावर हंसाश्र. होता. पुण्यास त्याच्या आईचे वडील

म्हणजे त्याचे मातामह रहात असत; त्यांच्याकडे व त्यांच्यामुळें श्री० बाबामहाराज यांचेकडेहि त्याचें बरेच वेळां खाजगी गाणें झालें. शिवाय याच वेळीं डेक्कनकॉलेजांत एक व प्लेग कँपमध्यें एक अशीं नारायणाचीं दोन सार्वजनिक गाणींहि त्या वेळीं पुण्यांत झालीं. हीं दोन्हीहि गाणीं फारच उत्कृष्ट झालीं असा त्या प्रसंगीं प्रत्यक्ष हजर असलेल्या ज्ञात्यांचा अभिप्राय आहे. नारायणाचीं सार्वजनिक स्वरूपाचीं व रसिकजनांपुढें झालेलीं अशीं हींच पहिलीं गाणीं होत. या पूर्वीचीं सर्व गाणीं सामान्य स्वरूपाचीं व सामान्य श्रोत्यांपुढें झालेलीं होतीं. या गाण्यांच्या योगानें आमच्या चरित्रनायकाच्या अंगच्या अत्युत्तम गुणांचें पूर्वदर्शन पुणेकरांना झालें. या वेळीं त्याचें वय तेरा चवदा वर्षांचें होतें. पुणें म्हणजे रसिकतेचें व मर्मज्ञतेचें माहेरघर अशी पुण्याची ख्याति आहे. एखादा वक्ता असो, गवई असो, नट असो, नाटककार असो, लेखक असो, जहाल असो, मवाळ असो, सुधारक असो, पुराणमताभिमानी असो पुणेंकर त्याची कसून परीक्षा घेतल्याखेरीज रहात नाहींत. आणि एकदां पुणेकरां-कडून **पासपोर्ट** मिळाला म्हणजे अखिल हिंदुस्थानांत त्याला हिंडण्यास मुळींच हरकत नाहीं. आणि जर कां पुणेंकरांच्या पुढें एखाद्याची रेवडी उडाली म्हणजे मग त्याला जगांत तोंड दाखवा-यलाच नको. अशा भयंकर परीक्षकांच्या परीक्षेंतून नारायणानें अल्पा-आपल्या लोकोत्तर गुणाच्या जोरावर पसार तराटन केलें. यावेळीं यणानें इतक्या बालवयांत गायनकलेंत ...ता. शाळेमध्यें एखाद्या

जेव्हां पुणेंकरांच्या दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हां त्यांना परम नवलें वाटलें. त्यांना त्याच्या गाण्यानें विलक्षण कौतुक वाटलें व त्यांचें प्रेम त्यानें लोहचुंबकाप्रमाणें आपल्या गाण्यानें आकर्षून घेतलें. आणि या आश्चर्यकारक गुणामुळें पुणेंकरांच्या मुखांतून साहजिकपणें ' बालगंधर्व बालगंधर्व ' असे उद्गार निघूं लागले. आणि अशाच एका प्रसंगीं केसरीकार लोकमान्य टिळक ( त्या वेळीं ' केसरी ' वर लो० टिळक आरूढ झालेले होते हें महाराष्ट्रीयांना श्रुतच आहे ) यांनींहि आपल्या व्याख्यानांत आमच्या चरित्रनायकाचा ' बालगंधर्व ' याच नांवानें उल्लेख केल्यामुळें तेंच नांव लोकप्रिय झालें.

या नांवाच्या महाराष्ट्रांत आजपर्यंत सवाईगंधर्व, तरुणगंधर्व, वृद्धगंधर्व अशा किती तरी सुधारलेल्या आवृत्या निघाल्या आहेत, पण नारायणरावांना मिळालेली गंधर्वाची उपमा व इतरांनीं स्वतःच लावून घेतलेली गंधर्वाची पदवी यांत महदंतर आहे. नारायणरावांना मिळालेली गंधर्वपदवी किती सार्थ आहे, किती योग्य आहे याबद्दल मतभेद असणें शक्य नाहीं. पण त्यांच्यावर ताण करण्याकरितां दुसऱ्यांनीं कितीही धडपड केली, आपणासही पदवीचें शेंपूट चिकटवून घेतलें तरी तें व्यर्थ आहे. मोर नाचतो म्हणून लांडोर नाचण्याप्रमाणेंच हें हास्यास्पद आहे. ' हंस ' व ' बगळा ' यांच्यात रंगाचें साम्य असलें तरी त्यांचें गुणभिन्नत्व स्पष्टच असतें, पण एखादा बगळा केवळ वर्णसादृश्याच्या जोरावर हंसाशीं स्पर्धा करूं म्हणेल तर तें जितकें

वेडगळपणाचें होईल तितकेंच तें वरील सवाई, तरुण, दीढीगंधर्वांच्या बाबतींतहि होणार आहे.

अशा रीतीनें नारायणरावांनीं आपल्या बालवयांत अपूर्व गाननैपुण्य संपादून महाराष्ट्राच्या लोकनायकाकडून गायनकलेंतील प्राविण्याबद्दल संगीत युनिव्हर्सिटीची सर्वांत श्रेष्ठ 'बालगंधर्व' ही पदवी मिळवली. आयर्व्हींगनें 'सर' ची पदवी मिळवून आपलें चारित्र्य उज्वल केलें तर नारायणरावांनीं 'गंधर्व' ही पदवी पटकावून आपलें व आपल्या धंद्याचें, आपल्या कलेचें नांव वाढविलें. केंब्रिज किंवा ऑक्सफर्ड युनिव्हार्सिटीच्या एम. ए. रँगलर, पी. एच. डी वगैरे पदव्यांहूनहि उच्च अशी पदवी नारायणरावांनीं अल्पवयांतच मिळवल्यामुळें त्यांच्या मातापित्यास व आप्तेष्टांस फार आनंद झाला. आणि कां नाहीं होणार? जन्मभर विद्याभ्यास करून कॉलेजांतील परीक्षांशीं टकरा घेतांघेतां एखादी लहानशी पदवी आपल्या मुलास मिळतांच जर त्याच्या मातेला अत्यानंद वाटतो तर मग आपला मुलगा इतक्या बालवयांत गायनकलेंत इतका निपुण झाला व लोकांत त्याची इतकी वाहवा होऊं लागली हें पाहून नारायणरावाच्या मातेला व श्रीपादरावांना परमधन्यता, आनंद व कौतुक वाटलें असल्यास त्यांत नवल तें काय?

याच वेळीं नारायणरावांच्या वडलांना अपघात होऊन त्यांच्या पायास इजा झाली; त्यामुळें त्यांना रजा घेऊन घरीं स्वस्थ बसणें भाग पडलें. त्यांची ही रजा बिनपगारी होती हें येथें

सांगणें जरूर आहे. शिवाय, त्यांच्या मातोश्रीसहि याच वेळीं मोठें दुखणें आलें आणि स्वता नारायणरावांनाही याच वेळीं कुत्रा चावून ते आजारी पडले. एकाच वेळेस अशी चोहोंकडून कठीण परिस्थिती उत्पन्न झाल्यामुळें या कुटुंबाची अवस्था फार करुणामयी झाली. पुढें थोड्याच दिवसांत नारायणराव दुखण्यांतून चांगले बरे झाले; पण त्यांचे वडील व मातोश्री यांचे दुखणें मात्र हटलें नाहीं त्यामुळें अर्थात्च नारायणरावांना कुटुंब पोषणाकरितां एखादा धंदा किंवा नोकरी करणें आवश्यक झालें. कुटुंबाची ही स्थिति पाहून त्यांचा धाकटा भाऊ बापू हा नोकरी करण्याकरतां मुंबईस गेला. या ठिकाणीं त्यांच्या धाकट्या भावाविषयीं दोन शब्द लिहिल्यास ते अप्रासंगिक होणार नाहींत.

बापुराव हे वडीलांचेपाशीं राहून विद्याभ्यास करीत होते. मराठी पांच इयत्ता पूर्ण झाल्यावर ते इंग्रजी शिकूं लागले. ज्ञानाची चहा व शिक्षणाची फार आवड असल्यामुळें ते भराभर परीक्षा उत्तीर्ण होऊं लागले. पण प्रत्येक विद्यार्थ्याची कसोटी पहाणारी केवळ दार्दानेल्सची सामुद्रधुनीच अशी मॅट्रीकची परीक्षा मात्र ते अनुत्तीर्ण झाले ! या दुर्गम सामुद्रधुनींत प्रत्येक विद्यार्थ्याचें शिक्षणाचें तारूं हटकून गोता खावयाचेंच असा सर्वसाधारण नियम असल्यामुळें बापुरावांचेंहि तारुं या ठिकाणीं बुडालें व त्यांच्या सर्व आशामहत्वाकांक्षा जागच्या जागींच जिरल्या. एखादा हुषार कर्णधार असला तर तो मात्र ही सामुद्रधुनी निर्धास्त उल्लंघून जातो. असो, बापुरावांचें शिक्षणाचें तारूं

अशा रीतीनें रसातळास गेल्यावर पुन्हां अभ्यास करण्यास व परीक्षा देण्यास अर्थातच त्यांना उमेद राहिली नाहीं. शिवाय याचवेळीं घरचा बोजा थोडाफारतरी त्यांच्यावर पडल्यामुळें त्यांनीं पुढें शिकण्याचा नाद सोडून देऊन मुंबईस एका इंग्लीश कंपनींत त्यांनीं नोकरी धरली. तिथें त्यांना चाळीस पन्नास रुपये पगार मिळे. विविधा रूपा मुंबा देवीनें यांना आश्रय दिलेला ! तेव्हां यांच्यांत विलासीपणा, पोषाखाची आवड, नाटकें, सिनेमा पाहणें वगैरे गुण ( ! ) आपोआपच शिरले. नोकरीचा वेळ खेरीज करून इंग्रजी कादंबऱ्या वाचणें, नाटकें आणि सिनेमा पहाणें, क्लबांत चकाट्या पिटणें, अपटुडेट पोषाख करून चौपाटी-वर हवा खाण्यास जाणें हा त्यांचा नित्यक्रम असे. पुढें त्यांच्या पहाण्यांत प्रसिद्ध महाराष्ट्रमंडळीचीं कीचकवध, भाऊबंदकी, मोहना इत्यादी जोरदार व उत्कृष्ट अभिनयांनीं सजविलेलीं नाटकें आलीं. तीं त्यांना फार आवडलीं आणि त्यांची महाराष्ट्र मंडळीविषयींची सहानुभूती व प्रेम वृद्धिंगत होऊन त्या मंडळी-कडे त्यांचा विशेष ओढा दिसूं लागला. महाराष्ट्र मंडळीची टापटीप, उच्च ध्येय, निर्व्यसनी व सुशिक्षीत नटचमू वगैरे स्पृह-णीय व्यवस्था अवलोकन करतांच त्यांच्या मनांत महाराष्ट्र मंडळींत शिरण्याचें आलें. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें महाराष्ट्र मंडळींत दुफळी झाल्यामुळें त्यांना चांगल्या स्त्रीपार्टी नटाची आवश्यकता लागली; ही संधी साधून त्यांनीं महाराष्ट्र मंडळींत प्रवेश केला. आणि आपल्या वडील बंधूप्रमाणें बापुरावही सुस्वरूप, देखणे,

मधुर आवाज वगैरे नाट्योपयोगी गुणांनीं युक्त असल्यामुळें लौकरच त्यांची मुख्य नायिकेच्या जागेवर स्थापना झाली. यांच्या शालिनी ( तारामंडळ ), यमुना ( वधूपरीक्षा ), सुवर्णदासी ( सत्वपरीक्षा ) वगैरे भूमिका सर्व बाजूंनीं उत्कृष्ट होतात. असा नाट्याभिज्ञांचा शेरा आहे.

---

## नाटकमंडळींत पदप्रवेश.

" As an actor confessed without rival to shine "
—*Goldsmith.*

रा० नारायणरावांच्या वडलांना अपघात होऊन ते आजारी पडल्यावर त्यांच्या कुटुंबाचा सर्व भार नारायणरावावरच पडला. कारण त्यांचे वडील बंधू जे होते ते आळशी, निरुद्योगी असल्यामुळें त्यांच्यांत कुटुंबपोषणाचें सामर्थ्य नव्हतें. तेव्हां नारायणरावावरच ती जबाबदारी येऊन पडली. या वेळीं त्यांना आपण कोणत्या धंद्यांत शिरावें किंवा कोणती नोकरी पत्करावी याविषयीं मोठा विचार पडला. नंतर बराच विचार करून त्यांनीं गायनाचेंच शिक्षण संपादून गवयाचा धंदा करण्याचें ठरविलें. परंतु गाण्याचें शिक्षण संपादावयाचें म्हणजे शिक्षकास वेतन दिलें पाहिजे आणि तें तर सध्यां अशक्य आहे. शिवाय दोनतीन वर्षांनंतर आपणांस स्वतंत्र रीतीनें गवयाचा धंदा करण्याची ऐपत

येणार, पण सांप्रतच्या अडचणीच्या प्रसंगीं हेंहि जमणें दुरापास्त आहे. अशा प्रकारचे अनेक विचार या वेळीं त्यांच्या मनांत येऊन गेले. नंतर त्यांनीं कोल्हापुरास श्री० पंडितमहाराज यांचे मार्फत श्री० सरकारांच्या शिफारशीनें कोल्हापुरचे सुप्रसिद्ध गवई अल्लादियाखां यांचे जवळ गाणें शिकण्याकरितां म्हणून १९०३ किंवा १९०४ सालीं नारायणरावांनीं कोल्हापुरास प्रयाण केलें.

नारायणराव कोल्हापुराला गेल्यावर श्री० पंडीतमहाराजाकडे त्यांचीं एकदोन गाणीं झालीं. त्यांपैकीं एका गाण्याच्या वेळीं श्री० सरकार स्वारी हजर होती.

त्या वेळचें नारायणरावांचें बालआवाजींतलें कर्णमधुर गाणें श्रवण करतांच श्री० महाराजांना आनंद झाला. त्यांना तें गाणें फार आवडलें व महाराजांचें नारायणरावांवर प्रेम बसलें. नारायणराव कोल्हापुरास जाण्यापूर्वीं जळगांवास नाट्यकलाप्रवर्तक मंडळीनें त्यांचीं एकदोन गाणीं ऐकलीं होतीं व त्यांचें गाननैपुण्य व सुंदर मुख पाहून या मुलाला आपल्या कंपनींत आणला तर आपला बराच फायदा होईल असें जाणून त्यांनीं त्याबद्दल नारायणरावांच्या वडिलापाशीं शब्द टाकला. परंतु " आमच्या नारायणाला नाटकांत पाठवावयाचा नाहीं, तो सध्यां शाळेंत शिकत आहे व तेंच शिक्षण पुढें चालवावयाचें आहे. त्याला आपली गाण्याची आवड आहे व आवाज आहे म्हणून त्याला कांहीं पदें शिकविलीं आहेत व म्हणून तो एखादे वेळीं तीं म्हणतो इतकेंच. " अशा तऱ्हेचें उत्तर त्या वेळीं श्रीपादरावांनीं



देव०—कोण मला बोलावतें आहे ! विद्याहरण.

दिलें होतें. पण हें उत्तर पुढें लौकरच कसें निष्फळ झालें हें पुढील हकीगतीवरून ध्यानांत येईल.

नारायणराव कोल्हापुरास येऊन राहिल्यावर एकदोन महि-न्यांनीं ते कानांनीं अधु आहेत असें सरकारस्वारीला आढळून आलें. तेव्हां औषधोपचार करण्याकरितां मिरजेस प्रख्यात डॉक्टर वॉन-लेस यांच्याकडे त्यांना पाठवायचें महाराजांनीं ठरविलें व त्या वेळीं नारायणरावांनीं मिरजेस खेळ करीत असलेल्या किर्लोस्कर संगीत मंडळींत उतरावें अशीहि व्यवस्था महाराजांनीं केली. व त्याप्रमाणें नारायणरावांनीं मिरजेस जाऊन किर्लोस्कर मंडळींत मुक्काम केला. त्या वेळीं ती किर्लोस्कर मंडळीची विलक्षण टापटीप, कै० अण्णासाहेबांचें एकमार्गी वळण, एकंदर दरबारी थाट, गुणी नटवर्ग आणि नाटकमंडळींतील सुखी जीवन, लौकिक व पैसा यांचा लाभ वगैरे त्यांच्या नजरेस पडतांच आपणहि याच धंद्यांत शिरलों तर आपला आर्थिक व लौकिक दृष्ट्या बराच फायदा होणार आहे, असा विचार त्यांच्या डोक्यांत आला. आणि आपला नाटकमंडळींत शिरण्याचा विचार त्यांनीं मंडळीच्या मालकापाशीं प्रगटहि केला. याचसमयीं रा० गोरे किर्लोस्कर मंडळींतून गेले होते; त्यामुळें मंडळीस एका उत्तम स्त्रीपार्टी मनु-ष्याची फार जरूर होती, आणि नारायणरावासारख्या गुणी, देखण्या व स्त्रीपार्टीला लायक अशा नटाचा आपणास लाभ झाला तर तें फारच चांगलें होईल असें पाहून त्यांनीं नारायण-रावांच्या विचारास आनंदानें होकार दिला. इतकेंच नाहीं, तर

आहे तेंही झालें नसतें. व संगिताची गोष्ट काढतांच जें नारायण-रावांचें नांव प्रथम मनांत येतें तेंहि आलें असतें किंवा नाहीं याबद्दल शंकाच आहे. परंतु ईश्वरी नेमानेम कांहीं निराळाच होता. आणि महाराष्ट्राच्या सुदैवानें नारायणराव एखादा शाळामास्तर किंवा खर्डेघाशा न होतां ईश्वरीनेमाबरहुकूमच सर्व गोष्टी घडून आल्या आहेत. परमेशानें त्यांना जन्मास घातलें तें खर्डेघाशा किंवा शिक्षक होण्याकरितां नसून सर्व महाराष्ट्रास वेड लावण्या-साठीं होय. महाराष्ट्राच्या प्रमुख पुरुषांत वसण्यास ईश्वरानें त्यांना अद्भुत गुण दिला आहे आणि महाराष्ट्राचें प्रेम आकर्षून घेण्याची अजब शक्ति त्यांच्यांत उत्पन्न करून ईश्वरानें त्यांना सर्वांचा आवडता पुरुष बनविला आहे. असो.

नारायणराव किर्लोस्कर मंडळींत दाखल झाल्यावर त्यांनीं एकामागून एक सर्व भूमिका करण्यास प्रारंभ केला. प्रथम त्यांनीं इंदिराकाकूचें काम केल्यावर शकुंतला, विषया, सरोजनी, सौदा-मिनी, वसंतसेना, शालीनी, भामिनी वगैरे भूमिका त्यांनीं केल्या. यावेळचें त्यांचें शकुंतलेचें काम इतकें उत्कृष्ट झालें कीं, कै० भाऊरावांच्या मागें असें काम झालें नाहीं व पुढें होणार नाहीं असें त्यावेळीं रसिकांचें व नाट्यभिज्ञांचें एकमत पडलें. सुंदर स्वरूप, कर्णमधुर गायन, योग्य अभिनय, मार्दव, शरीरसौष्ठव इत्यादि नटाला आवश्यक असलेल्या गुणांनीं नारायणराव मंडीत असल्यामुळें त्यांच्या भूमिका उत्तम वठून त्या लोकप्रिय होऊं लागल्या. किर्लोस्कर मंडळींत राहिल्यावर ज्या कित्येक सद्गृ-

हस्थांचा त्यांना सहवास घडून त्यांचे ज्ञानाचा लाभ घडला; त्यांत प्रसिद्ध गायनाचार्य भास्करबुवा बखले यांचा नामनिर्देश प्रामुख्यानें केला पाहिजे. रा. बखलेबुवा यांचेकडून नारायण-रावांना गाण्याचें विशेष ज्ञान झालें. तसेंच सुप्रसिद्ध हार्मोनियम-वादनपटु रा. गोविंदराव टेंबे यांचेपासून नारायणरावांना गाण्यांत विविधप्रकार कसे आणावेत, तें कर्णमधुर होऊन प्रेक्ष-कांच्या मनोवृत्ती तल्लीन कसें करील, गाणें कंटाळवाणें होऊं न देतां लोकरंजन करणें आणि गाण्यांतील भाव स्पष्ट दाखवून व अभिनयास धोका न पोंचेल अशा रीतीनें गायन व अभिनय यांची सांगड घालून त्याचें स्वारस्य वाढविणें, इत्यादि अत्यावश्यक गुणांचें ज्ञान त्यांना रा. टेंबे यांचेकडून झालें आहे. तसेंच त्यावेळचे किर्लोस्करमंडळीचे मालक व प्रमुख नट कै० नानासाहेब जोगळेकर आणि अभिनयपटु रा. बोडस यांचेकडून अनुक्रमें गायन व अभिनय यांचा त्यांना लाभ झाला. प्रथम कांहीं दिवस त्यांच्या भूमिका एकांगीं म्हणजे गाण्याच्याच तेवढ्या दृष्टीनें सरस वठत; अभिनयाकडे त्यांचें बरेंच दुर्लक्ष असे. पण पुढें महाराष्ट्रमंडळीच्या अभिनयकौशल्याचें आणि प्रसिद्ध नट रा. रा. गणपतराव जोशी यांच्या अलौकिक अभि-नयनैपुण्याचें ज्यावेळीं त्यांनीं बारकाईनें निरीक्षण केलें; त्यावेळीं त्यांना अभिनयाचें महत्त्व समजून आलें. त्यावेळीं त्यांना आढ-ळून आलें कीं, नाटकांतील भूमिका अभिनयाच्या अभावीं व्यर्थ आहेत. अभिनय हा भूमिकेचा प्राण आहे. अभिनय

आणि गायन यांचें योग्य मिश्रण झालें म्हणजे दुधांत साखर घातल्यप्रमाणें प्रेक्षकांना तें जास्त रुचकर लागतें. व सुधारकी शब्दांत बोलावयाचें झाल्यास गायन व अभिनय यांचा मिलाफ झाला म्हणजे तें सोडाव्हिस्कीच्या मिश्रणासारखें लज्जतदार लागतें. तेव्हां अभिनयाच्या अभावीं कितीही सुंदर गाण्यानें भूमिका खुलविण्याचें मनांत आणलें तरी तें ' श्रृंगारलें मढें । जीवेंवीण जैसें कुडें ' या साधुतुकारामोक्तिप्रमाणें निष्फल होणार आहे. अशी त्यांच्या मनाची पुरी खात्री झाली तेव्हां त्यांनीं अभिनय शिकण्याकडे सारें लक्ष घातलें व या कामीं नामांकित नाट्याचार्य रा० रा० देवल व रा. रा. खाडीलकर या विद्वानद्वयांचें त्यांना अतिशय साहाय्य झालें व नारायणराव नेहमीं त्यांच्या या उपकाराबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत असतात. आणि पूर्वींच्या त्यांच्या भूमिकांतील ही अभिनयाची उणीव त्यांनीं उत्कृष्ट भरून काढल्याकारणानें अलीकडील त्यांच्या भूमिका दोन्हीही दृष्टीनें फार सरस वठतात हें त्यांच्या मानापमानांतील भामिनी, वसंत-सेना, देवयानी इत्यादि भूमिका पाहिल्यास दिसून येईल.

' नाटकांत गाणें योग्य आहे किंवा नाहीं ' अशा तऱ्हेचा एक वादग्रस्त मुद्दा अलीकडे समाजांत उद्भूत झाला आहे. त्याचा निकाल कसाही लागो पण आम्ही एवढें मात्र खात्रीनें सांगतों कीं, नारायणरावांच्या बाबतींत मात्र वरील मुद्दा पुढेंच येऊं शकत नाहीं. कारण, गाणें म्हटलें म्हणजे तें कर्णमधुर असलें पाहिजे. आणि त्यांतल्यात्यांत नाटकांतलें गाणें तर विशेष मनो-

हर पाहिजे. राग व ताल यांचें ज्ञान व गवई थाटाचा ढंग अनिष्ट नसला तरी या शास्त्रीय ज्ञानानें गायनाची माधुरी बिलकूल कमी होतां कामा नये; गायनाचें शास्त्र हें रस व आनंद यांचें पोषकच असलें पाहिजे. तसेंच, रंगभूमीवरील गाणें व्यक्त व चटकदार असेल तरच तें लोकांना आवडेल. ह्या सगळ्या गोष्टी नारायणरावांना कळून चुकल्या असल्यामुळें ते आपलें गाणें निर्दोष व शास्त्रोक्त पद्धतीनें गाऊन लोकांच्या चित्तवृत्ती तल्लीन करून सोडतात. रंगभूमीवर बैठकीचें गाणें म्हणत बसणें किंवा आवाज रेंकून श्रोत्यांपुढें खाकरून पुनः पुन्हा ताना घोटीत बसणें, फार अयोग्य आहे हें नारायणरावांनीं पक्केपणीं जाणलें आहे. पद्यांतील शब्द अस्पष्ट म्हणणें, पदाच्या ओळीपेक्षां चोरट्या व निराळ्या आवाजांत तान घेणें, अवसानाबाहेर चढासूर घेऊन किंवा तान लांबवून मग बेसूर होणें, गातांना गोमुखीसारखें तोंड करून प्रेक्षकांना किळस उत्पन्न करणें, रेंकून किंवा भसाड्या आवाजानें गाऊन गाणें कर्णमधुर न करतां कर्णकटु करणें आणि तानांचा हॉविट्झर तोफांचा बेसुमार मारा करून प्रेक्षकांना ‘ नकोबुवा आतां हें गाणें ’ असें वाटावयास लावणें, इत्यादि हरहमेश महाराष्ट्र रंगभूमीवर आढळणारे तिरस्करणीय प्रकार व दोषसमुच्चय बालगंधर्वांच्या गाण्यांत औषधालासुद्धां मिळावयाचे नाहींत. आणि गाणें हें नाटकांस पोषक व्हावें, गाण्यामुळें रसहानी होऊं नये, अभिनयाचा त्याच्याकडून खून होतां कामा नये, उलट तें त्याला साहाय्यक व्हावें व त्याच्या योगानें नाटक-

प्रयोग सरस होऊन प्रेक्षक–श्रोते खूष होऊन जावेत हा जो नाटकांतील गाण्याचा मूळ उच्च हेतू, तो नारायणरावांच्या निर्दोषी व कर्णमधुर गाण्यानें उत्तम रीतीनें सिद्धीस जातो. व म्हणूनच नारायणरावांच्या बाबतींत तरी आम्ही असें म्हणतों कीं, नाटकांत संगिताची अत्यंत आवश्यकता आहे, त्याच्या योगानें नाटकाचें स्वारस्य वाढून प्रेक्षकांच्या मनावर इष्ट परिणाम झटकन होतो. उलट नाटकांत संगीत नसेल तर त्यामुळें नाटकाचें कोणतेंच कार्य सुफलीत होणार नाहीं असें आमचें प्रामाणिक मत आहे.

अगोदरच गाणें म्हणजे स्वर्गीय अमृत ! गानप्रियतेची नैसर्गिक देणगी प्रत्येक प्राणीमात्रांस ईश्वरानें दिलेली असते. हें अमृत एखादा दुःखी असो, विरही असो, क्रोधवश असो, कामीपुरुषास तर गाणें म्हणजे जीवन, शत्रू असो, मित्र असो, शूर असो, भ्याड असो, संकटग्रस्त असो, गरीब असो, पशू असो, पक्षी असो, एखादें हिंस्रजनावराहि असो; प्रत्येकाला हें गानामृत अतिप्रिय असतें. त्याच्या प्राशनानें प्रत्येकास त्याच्या दुःख, क्लेश, चिंता यांचा विसर पडून स्वर्गीय आनंदाचा लाभ घडतो. असें जें गायनरूपी स्वर्गीय अमृत त्याचे चषकच्या चषक नारायणरावांच्या मधुरकंठांतून श्रोत्यांना आकंठ पाजण्यांत आले तर तें सुख खरोखर अवर्णनीय नव्हे काय ?

नारायणराव नेहमीं खुल्या आवाजांत गातात; त्यांचा आवाज गोड असून चांगला चढतो. त्यांच्या तानेंत विविधता व सुंदरता

असते. शिवाय ती व्यक्त, दाणेदार, सुरेल व पल्लेदार आहे. व ती गिजबिज—स्वरांत स्वर गुंतून—कर्कश किंवा बेसूर होत नाहीं त्यामुळें ते गावूं लागलें कीं, प्रेक्षक आनंदानें डोलूं लागतात. सर्वसाधारण प्रेक्षकांना गाण्याचें शास्त्र ठाऊक नसतें; राग व ताल यांचें ज्ञान अर्थातच थोड्यानांच असणार; त्यासाठीं सुरेलपणा व माधुर्य हे गुण रंगभूमीवरच्या गाण्यांत मुख्य असावे लागतात, व या गुणांची नारायणरावांच्या ठिकाणीं ईश्वरदत्त योजना झालेली आहे. आतां प्रेक्षकांना खूष करण्याच्या भरीस पडून ते सुद्धां केव्हां केव्हां तानांचा अतिरेक करतांना आढळतात, पण हें अपरिहार्यच होत असतें असें लोकमत आहे.

महाकवि शेक्स्पियरच्या कृती आपल्या अनुपम अभिनय कौशल्यानें अंधारांतून सूर्यप्रकाशांत आणण्याचें श्रेय जसें तत्का-लीन प्रख्यात नट जो ग्यारीक त्याजकडे आहे, किंवा महारा-ष्ट्रांतील आधुनिक शेक्स्पियर रा. रा. खाडीलकर यांची जोरदार व ओजस्वी गद्यनाट्यरत्नें बहुजनसमाजापुढें आणण्याचें श्रेय जसें प्रसिद्ध महाराष्ट्रमंडळीस आहे, तसेंच कोणतेंही संगीत नाटक विशेषतः रा. कोल्हटकर व रा. खाडिलकर यांच्या संगीत कृती महाराष्ट्रापुढें उज्वल स्वरूपांत आणण्याचें बरेंचसें श्रेय नाराय-णरावानांच आहे. आज नारायणरावांच्या गोड कंठांतून निघ-णारीं मानापमान, सौभद्र, मूकनायक इत्यादि नाटकांतील ठळक ठळक पद्यें महाराष्ट्रीयांच्या कंठांत तांडव नृत्य करीत आहेत. असो; किर्लोस्कर मंडळींत राहिल्यावर एका वर्षानंतर त्यांचें लग्न

झालें. व आज त्यांना दोन मुलें झालीं आहेत. त्यांची पत्नी सुशील, पतिव्रता, सद्गुणी व सालस वृत्तीची आहे. त्यामुळें नारायणरावांचा संसार असार न होतां त्यांना सौख्यदायक झाला आहे. किर्लोस्कर मंडळींत राहिल्यापासून त्यांना अनेक विद्वा-नांचा चिरसहवास घडून त्यांच्या ज्ञानाचा त्यांना लाभ झाला. तसेंच कित्येक गुणीजनांचा परिचय होऊन एकमेकांना एकमे-कांच्या गुणांची देवघेव करावयास सांपडून उभयतांनाही फायदा झाला आहे. तसेंच त्यांना कित्येक राजपुरुषांच्यापुढें आपल्या गुणांचें प्रदर्शन करण्याचा सुप्रसंग आला आहे. सर्वत्रांशीं प्रेमळ-पणानें आणि सलोख्यानें वागण्याची त्यांची नेहमींची पद्धत असल्यामुळें मंडळींतील दरएक मनुष्यास त्यांचा सहवास प्रिय वाटे. प्रत्येकास त्यांच्याविषयीं अभिमान व प्रेम वाटे. त्यांना गुणाची चहा असल्यामुळें व ज्ञानाचे ते तृषित असल्यामुळें कोणापासूनही ते गुण व ज्ञान ग्रहण करीत असत. या कामीं ते केव्हांही आळस किंवा चुकारतट्टूपणा करीत नसत. सारांश, अशा प्रकारें किर्लोस्कर मंडळींत त्यांचें सुखकर वास्तव्य होऊन त्यांना कीर्ति व पैसा यांचा चांगला फायदा झाला. व त्यांच्या गुणांचें तेज वाढून त्या तेजानें महाराष्ट्रीयांचे डोळे दिपून गेले.

---

# स्वतंत्र नाटक मंडळी.

From life without freedom
Oh ! who would not fiy,
For one day of freedom
Oh ! who would not die.

*Tennyson.*

स्वातंत्र्य कोणाला प्रिय नाहीं ? स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं कोण धडपडत नाहीं ? असा कोण दुर्दैवी प्राणी आहे कीं, ज्याला स्वातंत्र्यसुख नको आहे ! अमेरिकेंतील सिव्हिलवॉर, शंभर वर्षांपूर्वीचें नेपोलियननें चालविलेलें रणकंदन, सांप्रत हिंदुस्थानांत चाललेली चळवळ ह्या सर्व गोष्टी स्वातंत्र्यप्राप्तीच्याच द्योतक नव्हेत काय ? स्वातंत्र्याच्या सुखकर कल्पनेनें प्रत्येक प्राणि-मात्राच्या हृदयांत थैमान करून त्यांना पारतंत्र्याची शृंखला तोडून टाकून स्वातंत्र्यमंदिरांत प्रवेश करण्याची उत्कट इच्छा उत्पन्न केलेली असते. व त्या इच्छाबलावर जो तो आपापल्या शक्त्यनुसार स्वातंत्र्यसिद्धीसाठीं प्रयत्न करीत असतो. मग आमच्या या ‘ राजहंसानें ’ हि किर्लोस्कर मंडळीच्या पिंजऱ्यांतून बाहेर पडण्याकरितां उत्सुक असावें यांत नवल काय ? आतां, तो पिंजरा जरी सुवर्णाचा असला तरी तो राजहंसास पारतंत्र्यच दाखवीत होता. सोन्याची सुरी झाली तरी ती प्राण घेणारच या न्यायानें तो सुवर्णपिंजरा या हंसाला बंधकच झाला होता. तेव्हां किर्लोस्कर मंडळीच्या पिंजऱ्यांत सतत आठ वर्षे कोंडून असलेल्या

ह्या स्वातंत्र्योत्सुक हंसानें बाहेर पडण्याची इच्छा धरली व बंधमुक्त होण्याकरितां उपाय शोधण्यांत तो गर्क असतां त्याच्याचप्रमाणें दुसऱ्या दोघां स्वातंत्र्योत्सुक विहंगांनीं येऊन त्याच्या पिंजऱ्याचा दरवाजा मोकळा करून त्याला बंधमुक्त केलें. आणि स्वातंत्र्य सरोवराचें मधुर जलपान करून यथेच्छ क्रीडा करण्यास त्यांनीं त्याला संधी दिली. असो;

बालगंधर्वांनीं किर्लोस्कर मंडळींत नोकर या नात्यानें आठ वर्षे काढल्यावर त्यांना सहाजीकच नोकरीचा पेशा सोडून मालकीपेशा स्वीकारण्याची इच्छा झाली. आणि याचवेळीं किर्लोस्कर मंडळीच्या कांहीं अंतस्थ भानगडीमुळें मंडळींत फाटाफूट होऊन बालगंधर्वांनीं रा. बोडस व रा. टेंबे यांच्या साहाय्यानें स्वतंत्र मंडळी काढण्याचें ठरविलें. त्यांच्या अद्वितीय गुणामुळें व या तिघांच्या लायकीमुळें त्यांना भराभर धनिकांचें, संस्थानिकांचें, विद्वानांचें आणि समाजधुरिणांचें साहाय्य व प्रोत्साहन मिळून १९१३ सप्टेंबरांत मुंबईस यांच्या गंधर्व मंडळीची डॉ० सर भालचंद्रांच्या हस्तें स्थापना झाली व नारायणरावांनीं आपले हेतू पूर्ण करून घेतले. गंधर्व मंडळी स्थापन झाल्यावर लौकरच तिला राजाश्रय व लोकाश्रय मिळून आज मंडळी सर्वतऱ्हेनें सुखी व लोकप्रिय झाली आहे. बालगंधर्वांनीं दुसरी जी एक महत्त्वाची कामगिरी केली आहे ती ही कीं, भारतगायनसमाज या नांवाची पुण्यास जी एक संस्था निघाली आहे तिचे बालगंधर्व प्रमुख घटक आहेत. या संस्थेचे ठिकठिकाणीं जलसे होत असतात व त्या-

प्रसंगीं लोकांना बालगंधर्वांचें बैठकी गायननैपुण्य ऐकावयास सांपडतें. नारायणरावांनीं हें कार्य केवळ स्वार्थत्यागपूर्वक अंगावर घेतलें आहे. यावरून त्यांच्या अंगच्या स्वार्थत्यागाची, स्वतांच्या गुणाचा लोकांना फायदा घेऊं देण्याची त्यांची उदारबुद्धि व स्वतांच्या गुणाच्या बाबतींत निगर्विवृत्ती वगैरे अत्युत्तम गुण दिसून येतात. गंधर्व मंडळी निघाल्यावर तिला जो एक अलभ्य लाभ झाला तो येथें नमूद करणें जरूर आहे.

आमच्या देशांत जीं कांहीं देशी संस्थानें आहेत त्यांत कलाकौशल्याच्या बाबतींत, औद्योगिक, शिक्षणविषयक व सामाजिक सुधारणेच्या बाबतींत बडोदें संस्थानचा नंबर पहिला लागेल. आणि विशेषेंकरून हल्लींचे श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांची तर सुधारणेचे पुरस्कर्ते गुणज्ञ, कलाप्रिय, प्रजापालनीदक्ष, शिक्षण व विद्या वगैरेंचे अभिमानी अशी ख्याति आहे; महाराजांनीं आतांपर्यंत अनेक शिक्षणसंस्थांना, उद्योगधंद्यांना, कलाकौशल्यांना मदत केली असून अनेक गवयांना, चित्रकारांना, नाटकमंडळ्यांना, नाट्यनिपुणिकांना, व ग्रंथकारांना, पारितोषकें व बिदाग्या देऊन महाराजांनीं त्यांचा बहुमान केला आहे, आणि त्यांना उत्तेजन दिलें आहे. महाराजांचें औदार्य हिंदुस्थानाबाहेर देखील लोकविश्रुत आहे. १९०१ सालीं **एडमंड रसेल** या नांवाचा एक विख्यात इंग्रजी नट मुंबईस आला होता, त्याला महाराजांनीं बडोद्यास नेऊन त्याचा तिथें राजकीय पाव्हण्याप्रमाणें मानमरातब ठेवला होता व जातांना त्याला मोठी देणगी देऊन

महाराजानीं त्याचा गौरव केला. तसेंच आमच्याकडील रा. गणपतराव जोशी, कै० वा. भाऊराव वगैरे प्रसिद्ध नटानांहीं देणग्या देऊन त्यांनीं त्यांच्यासंबंधीं प्रशंसोद्गार काढले आहेत. रा. बालगंधर्वांच्या संबंधींहि महाराजांच्या मनांत फार प्रेम होतें व त्यांच्या गाण्याच्या सर्वप्रिय गुणावर महाराज फार खूष झाले होते. तेव्हां बालगंधर्वांनीं स्वतंत्र मंडळी काढलेली पहातांच महाराजानीं त्यांना उत्तेजन दिलें; इतकेंच नाहीं पण त्यांच्या मंडळीस आपल्या सुखशीतल कृपाछत्राखालीं घेऊन मंडळीस ५००० हजारांचें वर्षासन करून दिलें. महाराजांच्या या औदार्यानें महाराजांची गुणज्ञता, नाट्यकलेसंबंधीं त्यांची सहानुभूति व बालगंधर्वावरील त्यांचें निर्मळ प्रेम दिग्दर्शीत झालें; आणि या राजाश्रयामुळें त्यांच्या गुणाची लकाकी अधिक वाढली. रास्तच आहे. कारण, ' विनाश्रया न शोभंते पंडिताः ' शिवाय आमच्या नाट्यकलेसहि प्राचीन कालापासून राजाश्रय असल्याविषयीं भारतनाट्यशास्त्रांत उल्लेख आहे. आणि राजानें आपल्या राज्यांतील कलाकौशल्य, शिक्षण, विद्या यांना उत्तेजन दिलें पाहिजे असें शुक्रनीतींत वचन आहे.× या वचनाचें पालन महाराजांनीं केल्याबद्दल धन्यता वाटते. महाराजांनीं दिलेल्या आश्रयामुळें गंधर्व मंडळीस तर आनंद झालाच असेल, पण दुर्दैवानें मध्यंतरीं बरेंच दिवस अनाथ

× विद्याकलानां वृद्धीः स्यात्तथा कुर्यान्नृपः सदा.
विद्याकलोत्तमान् दृष्ट्वा वत्सरे पूजयेच्चतान् ।

**शुक्रनीति.**

झालेल्या आमच्या नाट्यकलेचेहि पाय राजमंदिरास लागलेले पाहून प्रत्येक नाट्यकलाहितेच्छूस अत्यानंद झाल्यावांचून रहाणार नाहीं.

महाराजांनीं सर्व जगभर प्रवास करून अनेक प्रकारचें ज्ञान संपादन केलें आहे. व त्यांनीं निरनिराळ्या देशांतील नाट्यकलेची स्थिति अवलोकन केली असून देशोदेशींच्या नामांकित नटनट्यांचें अभिनयनैपुण्य त्यांनीं पाहिलें आहे. त्यामुळें महाराजांच्या ठिकाणीं बहुश्रुतपणा, रसिकता, गुणांची चहा, इष्ट सुधारणांची आवड वगैरे सद्गुण उत्पन्न झाले आहेत आणि त्या योगेंच नारायणरावांच्या अंगच्या सर्वोत्कृष्ट गुणांची महाराजांना खरी किंमत कळली व वरीलप्रमाणें त्यांनीं त्यांचा यथायोग्य सन्मान केला. व त्याबरोबरच महाराजांनीं आमच्या श्रेष्ठतम नाट्यकलेशीं ‘ शेक्‌ह्यांड ’ करून तिला आपल्या राजप्रासादांत नेऊन उच्चासनावर बसविली; या महाराजांच्या उपकाराबद्दल प्रत्येक नाट्यभक्त महाराजांचा ऋणी आहे. असो; अशा रीतीनें आमच्या चरित्रनायकानें आपल्या मधुर व आलापयुक्त गाण्यानें, नैसर्गिक सौंदर्यानें, शास्त्रोक्त अभिनयानें व निरलस वर्तनानें महाराष्ट्र वृन्दांना खुष केलें, त्यांचें मन रिझविलें; आणि अल्पावधींतच लोकाश्रयाबरोबर राजाश्रय संपादून स्वतांचें, आपल्या मंडळीचें आणि मुख्यत्वेंकरून आमच्या नाट्यकलेचें नष्टचर्य विलयास नेऊन त्यांचें भाग्य द्विगुणीत करून आपल्या सहाध्यायियांचें व महाराष्ट्रीयांचें प्रेम संपादन केलें आहे. आणि त्यांच्या या अत्युत्तम गुणावर लुब्ध होऊन कित्येक धनिकांनीं, राजेरजवाड्यांनीं व सद्गृहस्थांनीं त्यांना

वेळोवेळीं पारितोषकें दिलीं आहेत. व त्यांच्या गौरव केला आहे.

पोपनें प्रख्यात नट ग्यारिक यांचा अभिनय जेव्हां पहिल्यानें पाहिला, तेव्हांच त्यानें त्याच्यासारखा नट आजपर्यंत झाला नाहीं व पुढेंही होईलसा दिसत नाहीं असा अभिप्राय दिला. त्यावेळचे त्याचे उद्गार असे आहेत. "यार्शी स्पर्धा करण्यासारखा कोणीच नट नाहीं ही मोठी वाईट गोष्ट आहे. याच्या योगानें हा लौकर बिघडून जाईल." अशाच तऱ्हेचे उद्गार आमच्या चरित्रनायकाच्या संबधानें महाराष्ट्र तज्ज्ञांनीं वारंवार प्रगट केले आहेत. नारायणरावांचें प्रेक्षकावर इतकें वजन असतें कीं त्यांचें गाणें सुरूं होतांच प्रेक्षक समुदाय चित्रासारखा तटस्थ असतो. प्रत्येक नटाचें पहिलें काम म्हणजे आपल्या श्रोत्यावर वंजन पाडायचें, श्रोत्यांना आपल्या मुठींत ठेवायचें, हें आहे. ग्यारिकनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं:—

"It is the laudable ambition of every actor to win the approval of his audience."

आतां प्रेक्षकांना जिंकावयाचें म्हणजे कांहीं समशेर घेऊन त्यांच्यावर चालून जायचें नाहीं. तर आपल्या गुणप्रभावानें त्यांना मुग्ध करून टाकावयाचें. आपल्या अंगच्या सर्वोत्तम गुणदिप्तीनें त्यांना अंकीत करायचें व आपल्या प्रेमरज्जूनें त्यांना बांधून टाकावयाचें. प्रेक्षक जोंपर्यंत हातीं आले नाहींत तोंपर्यंत नटाचें रंगभूमीवरील कार्य तितकें सुपरिणामीं होणार नाहीं. प्रेक्षकांना वाटेल तसें झुलविण्याचें सामर्थ्य जोंपर्यंत नटांत आलें नाहीं तोंपर्यंत त्याला

ग्रा. क्र. ३३

प्रेक्षकांवर प्रभुत्व गाजविण्याची आसच नको. इंग्लंडांतील एक प्रख्यात नट एडमंड कीन याची तर अशी प्रतिज्ञा असे कीं, "I will make the audience as mad as I shall be."

सारांश; प्रेक्षकांना मुठींत ठेवण्याची हातोटी प्रत्येक नटाच्या अंगीं जरूर असली पाहिजे. हें सामर्थ्य आमच्याकडील नटांपैकीं रा. गणपतराव जोशी, केशवराव भोसले व प्रस्तुत चरित्रनायक एवढ्यांमध्येंच काय तें आहे; व त्यामुळें त्यांच्या आगमनाबरोबर प्रेक्षकांत जिकडे तिकडे शांतता नांदूं लागते. त्यांचे कांहीं अक्षम्य दोषही प्रेक्षक दृष्टीआड करतात. व त्यांच्या गुणांचें मनमुराद सेवन करतात. असो;

रा. नारायणरावांना श्री० गायकवाडसरकार, श्री० शिंदेसरकार, श्री० होळकरसरकार, श्री० छत्रपतीसरकार, श्री० देवाससरकार वगैरे राजेरजवाड्यांचा आश्रय मिळाला असून त्यांच्याकडून त्यांना मोठमोठ्या देणग्या मिळाल्या आहेत. त्याचप्रमाणें लोकमान्य टिळक, दे० श्री० दादासाहेब खापर्डे, केसरीकार श्री० केळकर, सर भालचंद्र, डॉ० त्रिलोकेकर इत्यादि विद्वान् पुढाऱ्यांचा त्यांना पाठिंबा आहे, त्यांचें प्रेम आहे व त्यांच्याकडून त्यांना नित्य प्रोत्साहन मिळत असतें. त्याचप्रमाणें त्यांच्या हिताविषयीं काळजी बाळगणारीं शेंकडो उदार हृदयें महाराष्ट्रांत असून त्यांना नाट्याचार्य देवल, खाडीलकर, कोल्हटकर वगैरे नाट्यनिपुणांचा सतत सहवास आहे. वरील सर्वांची नारायणरावांना प्रत्यक्ष किंवा हस्तें परहस्तें मदत, सहानुभूति, उत्तेजन व उपदेश मिळत

असल्याकारणानें नारायणराव आणि त्यांची मंडळी वाममार्गास जाण्याची अगर अपयशाच्या खोलगर्तेंत पडण्याची मुळींच धास्ती नको.

## स्वभाव आणि गुणवर्णन.

" Your profession has made you rich and you have made your profession respectable. "

*Dr. Johnson.*

वरील प्रशंसोद्गार विलायतेंतील प्रख्यात नट **ग्यारिक** याच्या-विषयीं त्याच्या गुरूनें म्हणजे तत्कालीन प्रसिद्ध कोशकार डॉ० **जान्सन** यानें एके प्रसंगीं काढले आहेत. याचा अर्थ—' धंद्याच्या योगानें तूं संपन्न झालास तसेंच तुझ्या योगानें तुझ्या धंद्यालाही प्रतिष्ठा आली ' असा आहे. आमच्या चरित्रनायकास देखील डॉ० जान्सनचे वरील प्रशंसोद्गार अगदीं तंतोतंत लागू पडतात. कारण, नारायणरावांना ज्याप्रमाणें या धंद्याच्या योगानें संपत्ति व लौकीक यांचा लाभ झाला तशीच त्यांच्यामुळें आमच्या नाटकंधद्यासही उर्जीतावस्था प्राप्त झाली आहे. त्यांच्यामुळें नाटकधंद्याचें गौणत्व नाहींसें होऊन तो मान्यतेस चढला आहे व म्हणूनच ग्यारीक संबंधीचे अडीचशें वर्षांपूर्वीचे डॉ० जान्सन्चे धन्योद्गार आज नारायणरावांना उत्कृष्ट लागू पडतात असें आम्ही म्हणतों. आतांपर्यंत आमच्या चरित्रनायकाच्या बारीक सारीक गोष्टींचें—कीं ज्या त्याच्या चारित्रांत विशेष महत्त्वाच्या व जरूरीच्या



देवयानी०:—

विद्याहरण.

होत्या—त्यांचें विवेचन केलें आहे. आतां सदर प्रकरणीं त्यांचें स्वभाव व गुणवर्णन करून ज्या सर्वोत्कृष्ट गुणांच्या जोरावर ते इतक्या मान्यतेस चढले त्यांचें वर्णन करावयाचें आहे.

नारायणरावांचा प्रमुख गुण कीं, ज्याच्या बलावर सगळ्या महाराष्ट्राला त्यांनीं झुलवलें व ज्याच्यामुळें त्यांचा लौकीक वाढला आणि त्यांचें चारित्र्य उज्वल झालें आहे तो गुण म्हणजे त्यांची **गाननिपुणता** हा होय. त्यांच्या साऱ्या चरित्राचें सार या गुणावर अवलंबून आहे. त्यांनीं आपल्या शास्त्रोक्त व गोड गाण्यानें पंडितांना व रसिकांना तर रिझवलेंच आणि त्यांच्या गाण्यानें गुणज्ञ, मार्मिक, रसिक व सहृदय प्रेक्षक तर खूष होऊन जातातच पण **ग्यारीकनें** म्हटल्याप्रमाणें——

" Who have not heads to think nor hearts to feel "

अशाही प्रेक्षकांचें उत्कृष्ट मनोरंजन त्यांच्या गाण्यानें व अभिनयानें होत असतें. नारायणरावांचें गाणें सुरू होतांच एकदम यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें सर्वकडे निस्तब्धता होऊन प्रेक्षकसमुदाय चित्रासारखा तटस्थ होतो. अशावेळीं एखाद्या टांचणीचा आवाजही मुलुखमैदान तोफेसारखा ऐकूं येईल. प्रेक्षकांची यावेळीं एवढी तंद्री लागलेली असते कीं, अशावेळीं शोणिततृषित खुर्चीरहिवाशीं ढेंकणांनीं त्यांचें कितीही रक्त आटविलें तरी त्याची त्यांना शुद्धही नसते. गारुड्याची पुंगी वाजूं लागतांच जसे सर्प डोलूं लागतात तद्वत् नारायणरावांचें मनोहर गाणें व ताना सुरू झाल्या म्हणजे प्रेक्षकगण आनंदानें डुलूं लागतो व

अशा प्रसंगीं ' नम्रा म्हणते मान ' या कव्युक्तीची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. आणि ' पीत्वा पीत्वा पुनः पीत्वा ' प्रमाणें प्रेक्षक अधाशासारखे वन्समोर करकरून नारायणरावांनीं वाढलेलें गानामृत आकंठ पिऊन आपली गानापिपासा तृप्त करून घेतात. सारांश; नारायणरावांची योग्यता वाढविणारा, त्यांना कीर्ती व पैसा प्राप्त करून देणारा व महाराष्ट्राचें प्रेमनिधान उपटणारा असा सर्वोत्कृष्ट गाण्याचा गुण त्यांच्या ठिकाणीं आहे.

नारायणरावांचा दुसरा गुण म्हणजे **निगर्विपणा** हा होय. हा गुण नाटकधंद्यांत जितका महत्त्वाचा आहे तितकाच तो इतर व्यवहारांतही असतो. या एका सद्गुणाच्या जोरावर जगांतील कितीतरी महत्त्वाचीं कामें सिद्धीस गेलीं आहेत. उलटपक्षीं या गुणाच्या अभावीं मोठमोठीं कामें व मोठमोठ्या लोकांचीं चरित्रें कवडीमोल झालीं आहेत हें जगाचा इतिहास आपणांस सांगत आहे. आजपर्यंत याच गर्वांधतेच्या पायीं चौदा चौकड्यांचें राज्य उपभोगणारा रावण, देवांना त्राहीभगवान् करणारा हिरण्यकशिपु, दुर्योधन-दुःशासन, शंभर वर्षांपूर्वीं युरोपांत धुमाकूळ घालणारा नेपोलियन बोनापार्ट या सर्वांचा निःपात झाला आहे व आज विश्वपीडक बनलेला राक्षसी महत्त्वाकांक्षी जर्मनकायसर याच्याहि नाशास हाच दुर्गुण कारणीभूत होणार आहे. सारांश, या दुर्गुणानें पछाडल्यामुळें आजपर्यंत थोर व कर्त्या पुरुषांचें जीवित मातीमोल झालें आहे. गुणी मनुष्यास तर निगर्विपणा हा गुण फार आवश्यक आणि शोभादायक आहे. परंतु व्यवहारांत तर अल्पशा

92160

गुणानें चढून जाऊन गर्विष्ट व बेमुर्वतखोर बनून विनय, मर्यादा, गोडभाषण इत्यादि गुणांना धाब्यावर बसवणारेच जास्त आढळतात. नाटक मंडळ्यांत तर हा गर्विष्टपणाचा दुर्गुण उत्कट प्रमाणांत दृश्यमान होतो.

नारायणराव इतके गुणी आहेत, त्यांना इतका लोकाश्रय आणि राजाश्रय मिळाला आहे, ते एका नाटकमंडळीचे मालक आहेत, ते एक महाराष्ट्रांतील नामांकित नट आहेत, परंतु इतर नटांमध्यें व नाटकी मालकांत दिसणारा गर्विष्टपणा व मिजासखोरपणा नारायणरावांच्या ठिकाणीं रतिभरहि नाहीं. व याबद्दल त्यांच्याविषयीं आम्हाला नेहमीं अभिमान वाटतो. नाहींतर, नाटकमंडळींत थोडासा अधिकार मिळतांच चढून जाणारे, एकदोन वन्समोर व बक्षिसें मिळतांच लागलीच 'ग' ची बाधा होणारे, अल्पशा गुणानें फुगुन जाऊन मालकाच्या डोक्यावर मिरीं वाटणारे आणि इतरेजनांशीं बेपर्वाइनें व आपणच कायते श्रेष्ठ अशा वृथाभावनेनें प्रेरीत होऊन फटकून वागणारे ज्ञानलवदुर्विदग्ध नटशिरोमणी आजकालच्या नाटकमंडळ्यांत नेहमीं नजरेस पडतात. अशा या अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेल्या आमच्या घमंडानंदन नटांना रा. बालगंधर्वांचा हा निगार्विपणा आपल्या अंगीं आणतां येणार नाहीं काय ? आणि हा सद्गुण त्यांनीं आपलासा केल्यास त्यापासून त्यांचें कांहीं नुकसान होईल काय ? परंतु जगांत सद्गुण दाखवणारे थोडे; दुर्गुण दाखवणारांचीच संख्या अधिक असते. आणि सुपथापेक्षां कुपथाकडेच लोकांचा ओढा विशेष असतो.

त्यामुळें आमचें हें लिहिणें त्यांना ( नटांना ) पटेलसें वाटत नाहीं.

नारायणरावांच्या निगर्विपणाप्रमाणें त्यांचा **विनयशीलता** हाही गुण वाखाणण्यासारखा आहे. आजपर्यंत कोणास एक रागाचा किंवा संतापाचा शब्द बोलल्याचें किंवा त्यांच्या मुखांतून एखादा वावगा शब्द अगर कुत्सितपणानें उर्मटपणाचें दुर्भाषण निघाल्याचें आजपर्यंत ऐकिवांत नाहीं. आणि त्यांच्या कोपाचा एखाद्यावर यदाकदाचीत् प्रसंग आलाच असेल तर तो परम भाग्यवान म्हटला पाहिजे. इतकी विनयशीलता त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळेंच दुसऱ्यांनाही त्यांच्याजवळ तुसडेपणानें वागण्याचें धाडस होत नाहीं. आणि हें केव्हांही सत्य आहे कीं, जर आपण दुसऱ्यांशीं विनयानें, प्रेमानें व नम्रतेनें वागूं तर दुसरेही आपणांशीं नम्रतेनें व प्रेमानेंच वागतील. लोकांचें प्रेम संपादावयाचें असेल तर लोकांवर प्रेम करण्यास शिकलें पाहिजे. हा देवघेवीचा प्रकार आहे. **स्वामी रामतीर्थ** आपल्या जपानांतील एका व्याख्यानांत म्हणतात—" दुसऱ्यांशीं ज्याप्रमाणें तुम्ही वागाल, दुसऱ्यांशीं जसें तुमचें वर्तन असेल त्याचप्रमाणें दुसरे तुमच्याशीं वागतील. कारण, जसा ध्वनि काढाल तसाच प्रतिध्वनि उमटेल. जें पेराल तेंच उगवेल; गहूं पेरून बाजरीची अपेक्षा कराल तर तें कधींच शक्य होणार नाहीं." पण आमच्या नटांना विनयाचें जणूं काय वावडेंच असतें. त्यांना नम्रता ही काडेचिराइताप्रमाणें कडु लागते पण तिचा सुपरिणाम ते लक्षांत घेत नाहींत. त्यांना विनय, गोडभाषण, गरीबीचें वर्तन या गोष्टी

आपणांस कमीपणा आणणाऱ्या आहेत असें वाटतें. पण त्यांनीं अंगीं नम्रपणा आणला म्हणजे त्यांचे गुण मलीन होतात कीं उज्वलीत होतात याची प्रचिती त्यांनीं घ्यावी; अशी आमची शिफारस आहे.

आमच्या नटांची स्थिति म्हणजे ‘ मिजास बादशहाची व धंदा भडभुंजाचा ’ अशी असते. गुण राईएवढा पण ताठा पर्वताएवढा; मान तिळाएवढा पण मिजास अमरकंटका एवढी; समाजांत किंमत बिंदुएवढीच परंतु गुर्मीमात्र ॲटलांटिक् महासागराएवढी असते. गुणसंपन्न पुरुषास आपोआपच विनय, नम्रता, निगर्व, प्रेमळ स्वभाव इत्यादि सुगुणांचें साहाय्य मिळतें व त्यामुळें त्याच्या प्रमुख गुणास तेजस्वीता येते. व ‘ विद्या ददाति विनयम् ’ या म्हणीचा भावार्थ तरी हाच आहे. गुणसंपन्नतेच्या फलभारामुळें मनुष्य सहजच विनम्र होतो पण अल्पगुणामुळें मात्र मनुष्य विनम्र न होतां जास्त गर्विष्ट, मानी व उर्मट बनतो. कारण, उथळ पाण्याला खळखळाट फार असतो असा सिद्धांत आहे. आणि नारायणराव हे सर्वगुणांनीं मंडीत असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं आपोआप विनयशीलता आली आहे. व ही विनम्रता उत्तम हिरा सुवर्णकोंदणांत ठेवला असतां जसें त्याचें तेज वाढतें तद्वत नारायणरावांच्या गाननैपुण्यास अधिक खुलवीत आहे.* नारायणरावांचें कंपनींतील मंडळीशीं प्रेमळपणाचें, सौज-

---

* विद्याविनयोपेतो हरति न चेतांसि कस्य मनुजस्य ।
कांचनमणिसंयोगो नो जनयति कस्य लोचनानंदम् ॥

न्याचें व सलोख्याचें वागणें असल्यामुळें त्यांच्याशीं कोणीही तुसडेपणानें व हेव्यादाव्यानें वागत नाहीं. त्यांच्या याच प्रेमळ वर्तनामुळें आज जगांत त्यांना एकहि शत्रु नाहीं. त्यांना अजात शत्रु म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं. ते किर्लोस्कर मंडळींत मुख्य नायिकेच्या जागेवर असतांना व आतां गंधर्व मंडळींचे मालक झाल्यावर देखील आपल्या हाताखालच्या नोकरांशीं व आपल्या बरोबरीच्या इतर नटमंडळीशीं वागण्यांत त्यांनीं कधींच प्रेमाचा, सौजन्याचा व विनयाचा अतिक्रम केलेला नाहीं. नाहीं-तर मुख्य नटांची व पुढें नटाचें मालकांत रूपांतर झालेल्या माण-सांची मंडळींत वागण्याची रीत कशी असते पहा. नोकर लोकांना बसल्या उठल्या शिवीशिवाय न बोलणें, इतर नटांचा एवढासाहि उत्कर्ष सहन न होणें, अगदीं क्षुल्लक गोष्टींत देखील स्वतःचा मानपान किंचित्‌हि ढळूं न देणें, कुचकें नाचकें व उप-रोधिक बोलून दुसऱ्याचा पाणउतारा करणें वगैरे त्यांच्या नित्य-क्रमांतील गोष्टी असतात. व हे दोष त्यांच्या ठिकाणीं इतके बद्ध-मूल होऊन बसलेले असतात कीं त्यापासून त्यांना परावृत्त करणें दुरापास्त असतें. आणि अशा प्रकारचे नट शिरजोर बनून मालकास पदोपदीं जेरीस आणतात. त्यांतून स्त्रिपार्टी नट तर मालकास फारच डोईजड होऊन बसतात. कारण, बाजारांत त्यांनाच मागणी फार असते व त्यामुळें त्यांना स्वर्ग म्हणजे दोनच बोटें उरलेला असतो आणि त्या कारणानें स्त्रीनटांसाठीं तर माल-कांस हरघडी अपमान सोसावा लागतो. त्याला त्यांच्या तब्येती

संभाळतां संभाळतां अगदीं नाकीं नव येतात. बरें असें न करावें तर धंदा बसण्याचा संभव ! त्यामुळें त्याला सर्व अपमान निमुट-पणें सहन करावा लागतो. पण आमच्या चरित्रनायकानें मात्र आपल्या मालकास तिळभरहि अपमान किंवा शिरजोरीचा त्रास दिला नाहीं. नारायणरावांच्या प्रेमळ वर्तनानें, सलोख्याच्या वागणुकीनें, परोत्कर्षसाहिष्णुतेनें आणि सद्वर्तनानें त्यांचा दुसऱ्या कोणाला अगर दुसऱ्या कोणाचा त्यांना हेवा, द्वेष, मत्सर व त्रास कधींच वाटला नाहीं. विश्वकुटुंबित्वाचा याहून दुसरा कोणता उत्कृष्ट मासला पहावयास सांपडेल ?

हातांत एवढासा अधिकार येतांच डोळे फाटून जातात असा अनुभव आहे. अधिकारमदानें मनुष्य धुंद होऊन गेला म्हणजे त्याच्या ठिकाणीं बेपर्वाई, इतरांशीं फटकून वागणें, मिजासखोर बनणें, क्षुल्लक गोष्टींतहि मानपान पहाणें इत्यादि दुर्गुण सद्गु-णांच्या जागीं अधिष्ठीत होऊन मनुष्यास भंडावून सोडतात. पण या सर्व दुर्गुणांपासून आमचा चरित्रनायक अगदीं अलिप्त आहे. घरांत आईबापांशीं अगर भावंडाशीं जी त्यांची मर्यादेची, विनयाची व प्रेमाची वागणूक असे तीच वागणूक शाळेंत मास्त-रांशीं व सहाध्यायियांपाशीं त्यांची असे, तीच किर्लोस्कर मंडळींत नोकर असतांना दिसे आणि आतां गंधर्व मंडळींचे मालक झाल्यावरहि त्यांच्या विनयशील, निवर्गी, प्रेमळ व सहानुभूती-पूर्ण वागणुकींत एक केंसभर देखील फरक पडलेला नाहीं. आमच्या सामान्य चरित्रनायकाच्या अंगचा हा अत्युत्तम गुण

अधिकार मदिरेनें धुंद होऊन आपल्या हाताखालील नोकरांना बुटाच्या लाथा मारणाऱ्या व त्यांचा नानाप्रकारें छळ करणाऱ्या अधिकारसंपन्न लोकांनीं आणि नाटकमंडळीच्या मिजासी मालकांनीं, तसेंच गर्विष्ठ व शिरजोर नटांनीं आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यापासून कांहीं तोटा होईल काय ?

नारायणराव जरी किर्लोस्कर मंडळी सोडून गेले तरी त्या मंडळीविषयीं त्यांची पूज्यबुद्धि अगदींच पूज्य झाली नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. तसेंच त्यांना उन्नतिगिरीवर चढविणाऱ्या सद्गृहस्थांविषयींची त्यांच्या अंतःकरणांतील कृतज्ञता तिळभरहि ढळलेली नाहीं. आणि किर्लोस्कर मंडळींतील अगदीं लहानापासून थोरापर्यंत असलेलें त्यांचें प्रेम यत्किंचित् देखील नष्ट झालेलें नाहीं. ते किर्लोस्कर मंडळीसंबधानें नेहमीं म्हणतात कीं, " माझी जन्मदात्री आई मला जितकी वंद्य आहे तितकीच वंद्य व पूज्य माझी ज्ञानदात्री व अन्नदात्री ( किर्लोस्करमंडळी ) मला आहे. व प्राण गेला तरी तिच्याविषयींचा माझा पूज्यभाव व अभिमान कदापिही लुप्त होणार नाहीं. तिचें मी नेहमीं अभिष्टच चिंतणार ! ती माझी आई आहे. मी अज्ञान होतों, असमर्थ होतों तोंपर्यंत तिच्या मांडीवर खेळत होतों, बागडत होतों. पण आतां मी कर्तासवरता झालों त्यामुळें आईपासून दूर व्हावें लागलें. व याबद्दल माझ्या आईलाही वाईट न वाटतां उलट आपला मुलगा मिळवता झाला याबद्दल तिला धन्यताच

वाटेल. " अशा प्रकारचे विनयाचे, अभिमानाचे व प्रेमाचे उद्गार ते काढीत असतात; इतका त्यांच्या मनांत किर्लोस्कर मंडळीविषयीं अद्यापहि आदर व पूज्यभाव आहे. या त्यांच्या उदार मनस्कतेचें व अढळ प्रेमाचें कोणाला कौतुक वाटणार नाहीं ! असो.

नारायणरावांचा चवथा सद्गुण म्हणजे **निर्व्यसनीपणा** हा होय. नट आणि तो निर्व्यसनी ही गोष्ट आमच्याकडे थोडी चमत्कारिक वाटण्यासारखीच आहे. कारण या विशेष्य–विशेषणांची एवढी दाटमैत्री कधींच शक्य नाहीं. पण आमच्या चरित्रनायकानें ही अशक्य गोष्टहि आपल्या निर्मळ वर्तनानें व अव्यसनित्वानें शक्य करून दाखविली आहे. व्यसनाधीनतेमुळें आजपर्यंत कुलक्षय, संसाराची धुळधाण, राज्यनाश यांसारखे मोठमोठे अनर्थ जगांत झाले आहेत, होत आहेत व आमच्या दुर्दैवानें पुढें होणार आहेत ! त्यांतल्या त्यांत दांरू आणि बाहेरख्याली हीं दोन दुर्व्यसनें तर आजकाल फारच बोकाळलीं आहेत. व आमच्या नाटकमंडळ्यांतहि या व्यसनद्वयांचा पदप्रवेश झाला आहे. परंतु आमच्या चरित्रनायकाचें भाग्य थोर म्हणून यांपैकीं एकाही दुष्ट व्यसनानें त्याला ग्रासलेलें नाहीं. इतकेंच नाहीं पण अगदीं लहानसहान व्यसनापासूनहि ते पूर्ण अलिप्त आहेत. त्यांच्या या गाढ निर्व्यसनतेचीं दोन तीन कारणें आहेत. एकतर लहानपणापासून त्यांच्या आईबापांची उत्तम शिकवणूक, त्यांच्यावर त्यांची सक्तनजर, उत्तम गुणांचें व सदाचार, सद्वर्तन

यांचें त्यांच्या मनोभूमींत त्यांनीं केलेलें बीजारोपण; शिवाय, स्वतः श्रीपादराव व अन्नपूर्णाबाई यांचें शुद्धवर्तन, आस्तिक्य-बुद्धी, धर्मपरायणता, सच्छीलता वगैरे सद्गुणमंडीत आचरण असल्यामुळें त्यांच्या मुलांच्याहि ठिकाणीं त्याच सद्गुणांचें लेपन झालें आहे. आणि ' शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं ' या न्यायानें शुद्धाचरणी, धर्मभीरु आईबापांच्या उदरीं नारायण-रावासारखे सुलक्षणी पुत्र जन्मास आले. त्यांच्या निर्व्यसनीपणाचें दुसरें कारण असें कीं किर्लोस्कर मंडळीसारख्या निर्व्यसनी, सच्छील व सुशिक्षीत मंडळींत त्यांचीं आठ वर्षे गेलीं, त्यामुळें त्यांची नीतिमत्ता अस्तंगत न होता तिला अनुकूल परिस्थितीनें पोषणच मिळालें. तिसरें कारण, योग्य वेळीं त्यांच्या पायांत संसाराची बिडी पडल्यामुळें त्यांना बाहेरख्यालीसारखें व्यसन जडलें नाहीं. व त्यांचें मन चांगलें खंबीर असल्याकारणानें कोणत्याही दुर्व्यसनानें त्यांना पछाडलें नाहीं. शिवाय ही व्यसनाची चटक मनुष्याला कांहीं उपजत नसते, कुसंगतीमुळें मनुष्यास हीं पिशाच्चें पछाडीत असतात. ह्या व्यसनांचीं सुखकर दर्शनें दाखवावयास ' कलुषा ' सारखे कोणीतरी जिवाचे कलिजे असावे लागतात. परंतु असे मतलबसाधू, दुष्ट कलुषे, सुदैवानें आजपर्यंत नारायणरावांना भेटले नाहींत हें त्यांचें व आमचें भाग्यच ह्मणावयाचें !

कित्येक दुष्ट व्यसनांमुळें नाटकांतील मुलांच्या शरीराची, सौंदर्याची आणि अब्रूची धूळधाण झाली असून अल्पवयांतील

वाईट खोडी व व्यसनें यांमुळें त्यांच्या मधुर आवाजाचें खोबरें होऊन त्यांना हातांत नरवंटी घेऊन भीक मागण्याची पाळी आली आहे. पण नारायणरावांच्या निर्व्यसनीपणामुळें आज सतत तेरा वर्षें मेहनत पडूनही त्यांच्या आवाजांत तिळभरहि कमीपणा आलेला नाहीं. ते एकसारखे तेरा वर्षें नाटकांत कामें करीत आहेत, शिवाय त्यांच्या खाजगी बैठकी देखील आजपावेतों किती तरी झाल्या आहेत; पण एक दिवससुद्धां त्यांचा आवाज बसल्याचें ऐकिवांत नाहीं. याचें कारण, त्यांची निर्व्यसनी रहाणी, शुद्ध वर्तन, नियमीत आहार, निरोगी शरीर, तेलकट, तिखट, उत्तेजक, तामसी पदार्थ सेवन न करणें, त्यांची सात्त्विक मनोवृत्ति हें होय. शिवाय, आवाज हें आपलें हत्यार आहे. ( हत्याराचा कायदा असला, तरी हें हत्यार बाळगण्यास सरकारची मुळींच आडकाठी नाहीं. ) आवाज हेंच आपलें सर्वस्व आहे, आवाजच आपला प्राण आहे. तेव्हां हें हत्यार गंजूं न देण्याची, हें सर्वस्व न गमावण्याची व हा प्राण मरूं न देण्याची पूर्ण खबरदारी राखणें हें आपलें मुख्य व आद्यकर्तव्य आहे हें नारायणरावांनीं पक्केपणीं जाणलें आहे, आणि ही जाणीव विस्मृतीच्या पडद्याआड होऊं न देतां सतत आपल्या दृष्टीसमोर त्यांनीं तिला ठेवलेली आहे. ज्याप्रमाणें हा काळपर्यंत त्यांचा आवाज पूर्ण निकोप व गोड आहे तसेंच आज तेरा वर्षें नाटकांत कामें करूनहि त्यांचें लावण्य, त्यांच्या मुखावरील तेज आणि त्यांची शरीरप्रकृति अझूनहि पूर्वींइतकीच निरोगी, तेजः-

पुंज व मनोहर आहे. नाहींतर, नाटकमंडळींत राहून थोडेच दिवस झाले नाहींत तोंच गालफडें बसलीं आहेत, डोळे पाताळांत प्रवेश करीत आहेत, शरीर सुदामदेवाशीं स्पर्धा करीत आहे, मुखावरील तेजानें ' तोंड काळें ' केलें आहे, घंटेसारखा खणखणीत आवाज बद्द रूपयाला किंवा मृत्तिकाघटाला लाजवीत आहे, नित्य विडी ओढण्याच्या व्यसनामुळें तोंडाची दुर्गंधी नरकाचें साम्य पटवीत आहे, धूम्रपानामुळें अधरांना पक्व बिंबाची उपमा न शोभतां पक्व जांभळाचीच उपमा जास्त अन्वर्थक होत आहे; नटणें, मुरडणें, इष्कीबाज पोषाख करून नटवेपणानें रस्तोरस्तीं भटकणें इत्यादि महत्त्वाचीं कामें करण्यांत गढून गेल्यामुळें ज्यांनीं ' निरुद्योगी ' व ' आळशी ' पणाचीं सुवर्णरौप्यपदकें मिळविलीं आहेत, अशा आजकालच्या नटांचें एक चित्र व आमच्या चरित्र-नायकाचें एक चित्र अशीं दोन चित्रें समाजापुढें ठेवून आम्ही त्याला असा सवाल करतो कीं, " हें चित्र पहा आणि हें चित्र पहा; ह्या दोन नटांच्या अगदीं हुबेहूब प्रतिमा आहेत. यांपैकीं कोणतें तुह्माला आवडतें ? आणि यांपैकीं कोणत्या प्रतिमेला तुम्ही सर्टिफिकीट द्याल ? " असा सवाल करतांच एकदम सर्व समाज उद्गार काढील ' दुसरें चित्र अधिक मोहक आहे, तेंच आम्हाला आवडलें आणि त्यालाच आम्ही सर्टिफिकीट देणार ! ' सारांश, नारायणरावांच्या गुणज्ञतेचें, निर्व्यसनतेचें, निरभिमानतेचें, विनम्रतेचें, प्रेमळपणाचें आणि सौजन्याचें वर्णन करण्यास भाषेची गति कुंठीत होते, शब्दांचा पुरवठा संपून जातो !

नटांच्या नीतिमत्तेवर व त्यांच्या खाजगी वर्तनावर रंगभूमीवरील त्यांचें कार्य बऱ्याच अंशीं अवलंबून असतें. त्यांची नीतिमत्ता जितकी उच्च कोटीची असेल तितकी त्यांची भूमिका सरस किंवा निरस वठेल. एखादा जात्याच खुनशी, द्रव्यलोलुप व विषयाकांक्षी असलेला नट जर तुकारामाची भूमिका सरस वठवूं पाहील तर त्याच्या प्रपितामहालासुद्धां तें शक्य होणार नाहीं. या ठिकाणीं एका अनीतिमत्तेच्या व्यसनी नटाची जी एक मौज आम्हास पहावयास सांपडली आहे ती नमूद करितों. आम्ही एकदां ' त्रिमूर्ती ' नाटक पहावयास गेलों होतों. त्यांत श्रीदत्तात्रय हे उपदेश करून लोकांना विषयापासून व व्यसनापासून परावृत्त करीत आहेत व एका ठिकाणीं गरीब लोक मजेनें मद्यपान करीत असतां त्यांना त्यापासून दूर रहाण्याचा दत्तात्रय उपदेश करीत आहेत असा एक प्रवेश होता. त्या नाटकांत दत्ताची भूमिका घेतलेला नट दारू पिऊन अगदीं टेर झाला होता. व तोंडानें ' बाबारे दारू पिऊं नका, दारूसारखें अब्रू, धन व शरीर यांचा नाश करणारें दुसरें व्यसन नाहीं ' अशा प्रकारचा उपदेश लोकांना ते दत्तात्रय करीत होते व स्वतः दारूच्या निशेंत झोंकाड्या खाऊन ' ब्रह्मानंदीं लागली टाळी कोण देहाते सांभाळी ' या उक्तीची सार्थकता पटवीत होते. अशा तऱ्हेचें दृश्य जर रंगभूमीवर दिसलें तर नाटकांचा लोकशिक्षण देण्याचा कितीही उच्च--किंवा उच्चतम म्हणा पाहिजे तर--हेतू असला तरी तो सिद्धीचा पल्ला गांठणार कसा ? अशा प्रकारानें

लोकशिक्षण देण्याची हांव धरणें म्हणजे एखाद्या गुत्तेवाल्यानें दारू-विक्रीचें काम सुरूं ठेवून तोंडानें दारूच्या दुष्परिणामांचें मोठ्या कळवळ्यानें वर्णन करून आपण मद्यपाननिषेध करून देशाची मोठी सेवा केली म्हणून शेखी मिरविण्याप्रमाणें मूर्खपणाचें आहे. यासाठीं नटांची नीतिमत्ता उच्चदर्जाची पाहिजे, त्यांचें खाजगी वर्तन सद्गुण, सदाचार इत्यादींनीं युक्त पाहिजे. नट हे उपदेशक आहेत, नट हे शिक्षक आहेत तेव्हां त्यांनीं स्वतः प्रथम सच्छील व शुद्धवर्तनी होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विहीरींतच नाहीं तर पोहऱ्यांत तरी येणार कोठून ? तेव्हां नटांनीं सत्वगुणी, सदाचारी व सद्वर्तनीं असणें जरूर आहे.* आणि नटांची नीतिमत्ता, त्यांचे आचारविचार सुगुणमंडीत असतील तरच नटांना समाजांत मानमान्यता मिळेल; तरच समाज त्यांना आपल्या कडेवर घेऊन त्यांना गोंजारील; तरच नाटकांचा लोकशिक्षण देण्याचा स्तुत्य हेतू सुफलीत होईल आणि तरच नाट्यकलेची, नाटकधंद्याची आणि नटांची उन्नति होईल.

---

* नट कुलीन बुद्धीमान । गुणें असावा सत्वप्रधान ।
नसावाच वयें जीर्ण । रूपहीन दुर्मुख ॥
शुद्धगुणी स्त्री वा पुरुष । त्यानेंच घ्यावा नटवेष ।
अनीति मताचा स्पर्श । या नाट्यास नसावा ॥
नाट्य व्हाया सर्वमान्य । नट हवेत सद्वर्तन ।
तरीच प्रयोग प्रेक्षण । जनांचें मन बोधील ॥

**नाट्यकथामृत.**

विलायतेंतील नटांची या बाबतींत समाधानकारक स्थिति आहे. त्यांची नीतिमत्ता, सदाचार, सद्वर्तन, आचारविचार वगैरेविषयीं स्पृहणीयता दिसून येते. आणि म्हणूनच **ग्यारीक**-सारख्या नटाचीं मोठमोठीं स्मारकें तिकडे करण्यांत येतात. **आय-र्व्हिंग**सारख्या नटास नाईटची पदवी मिळते; त्याला बादश-हांच्या पंक्तीचा बहुमान मिळतो; त्याच्या स्मारकासाठीं वाटेल तितका पैसा समाज घ्या घ्या म्हणून देतो आणि त्याचा उल्लेख करतांना 'He was the greatest actor' असे धन्योद्गार काढतात. १९१२ सालीं टिटॅनिक आगबोटींत ख्रिस्तवासी झालेल्या **मि० स्टेड साहेबा**सारख्या मान्यवर व विद्वान गृहस्थाची कन्या वडि-लांच्या परवानगीनें नाटकी पेशा स्वीकारते इत्यादि गोष्टी पाहिल्या म्हणजे विलायतेंतील नाट्यकलेची उत्क्रांती, नटाच्या धंद्याची श्रेष्ठता, नाट्यकलेचें समाजाशीं झालेलें एकीकरण, समाजाच्या हातांत हात घालून चाललेला नाट्यकलेचा संचार, आणि नटांच्या नीतिमत्तेची, त्यांचा सदाचार, शिष्टाचार व समाजाशीं मिळून मिस-ळून वागण्याची त्यांची पद्धत या गोष्टी अवलोकन करून मनास मोठें समाधान व कौतुक वाटतें. पण उलटपक्षीं आमच्याकडील नाट्यकलेची हीन स्थिति, नाटकमंडळ्यांच्या फाटाफुटी, नटांचें समाजाशीं फटकून वागणें, त्यांचा नीतिमत्तेच्या संबंधांत अधः-पात, त्यांच्या ठिकाणीं असलेलें गुणांचें अल्पप्रमाण परंतु मिजाशी, गर्विष्ठपणा, नटवेगिरी, छानछोकी, सभ्यतेचा अभाव आणि अहंमन्यता इत्यादि दुर्गुणांचें व्यस्तप्रमाण पाहिलें म्हणजे

मन व्यग्र होऊन दारुण निराशा वाटूं लागते व त्यामुळें किंचित् खेदही होतो. या ठिकाणीं थोडेंसें विषयांतर झालें. पण वस्तुस्थिति दाखवतांना थोडें विषयांतर झाल्यास तो दोष क्षम्य असतो; हें येथें सुचवून ठेवतों. असो.

आतां चरित्रनायकाच्या गुणवर्णनाबरोबर त्याच्या अंगच्या कित्येक बारिकसारीक दुर्गुणांचें व दोषांचेंहि वर्णन करणें जरूर आहे. कारण चरित्रनायकाच्या गुणांचाच तेवढा नगारा पिटावयाचा व त्याच्या अंगच्या दोषांचें नांवहि उच्चारावयाचें नाहीं असा कित्येक चरित्रकारांचा प्रघात असतो. पण अशा करण्यानें चरित्र एकांगीं व बरेंचसें अयोग्यहि होतें व त्यामुळें चरित्रकारावर अंधश्रद्धेचा व असभ्यतेचा दोषारोप येण्याचा फार संभव असतो. व त्या दोषारोपास अपात्र होण्याकरितां आम्ही नरायणरावांच्या एकदोन लहानसहान दुर्गुणांचें उद्घाटन करण्याचें इच्छितों.

नारायणरावांत पहिला जो दोष आहे तो हा कीं, ते व्यवहारज्ञानांत अद्याप अज्ञान आहेत. तसेंच फाजील विनयानें व गरीबीच्या वागण्यानें फसवे व लुच्चे लोक त्यांना टोपी घातल्याखेरीज रहाणार नाहींत. त्यांतून आतां तर ते एका मोठ्या संस्थेचे चालक--मालक असल्यामुळें तर त्यांना हुशारी, व्यवहारचातुर्य, मुत्सद्देगिरी, धोरण इत्यादि व्यावहारीक गुणांची फार आवश्यकता आहे. या गुणांच्या अभावीं एखादा कार्यसाधु, व्यवहारज्ञ त्यांना एखादे वेळीं सपशेल लुबाडल्याखेरिज रहाणार नाहीं.

नारायणरावांच्यांत नुकताच प्रकाशमान होणारा मोठा दोष कीं, ज्याबद्दल हल्लीं जिकडे तिकडे चर्चा सुरूं झाली आहे तो त्यांच्या वेषालंकाराच्या बाबतींतील आहे. हा दोष अगदीं अलीकडे म्हणजे गंधर्वमंडळीचे मालक झाल्यावर त्यांना जडला आहे. सुभद्रेसारख्या पौराणिक युवतीला एखाद्या वेश्येप्रमाणें वस्त्रालंकारांनीं विभूषित करणें, कांहीं भूमिका सजविण्यांत अक्षम्य दोष करणें, वेळीं अवेळीं वेश्येप्रमाणें केंस उलटे फिरवून अंबाडा बांधणें, भव्य निटीलाकाशावर बारीकशीच कुंकवाची टिकली लावणें; कीं जी अगदीं काकदृष्टीस देखील दिसणें अशक्य आहे. दागिन्यांच्या बाबतींत कधीं अतिरेक करणें तर कधीं कांहींच न घालणें, आपल्या भूमिकेस अयोग्य अशा रीतीनें कधीं कासोटा न घालणें तर कधीं त्यांत अप्रासंगिक असे विविधप्रकार करून रंगभूमीवर येणें; तसेंच, कारण नसतां अशोभीत असा पुणेरी जोडा पायांत घालणें, केशरचनेच्या बाबतींत सुद्धां निष्कारण फेरफार करणें वगैरे नाट्यशास्त्राची पायमल्ली करणारे आणि भूमिकेचें श्रेष्ठत्व व अतिक्रमण करणारे बरेच दोष दुर्गुण अलीकडे त्यांच्या भूमिकांत वर डोकें काढूं लागले आहेत आणि ते व्यर्थ लोकचर्चेला कारण झाले आहेत. शिवाय त्याबद्दल वर्तमान-पत्रांतूनही अनेकदां गवगवा झाला आहे. तेव्हां ते वर डोकें काढत आहेत तोंच त्यांना रसातळांत दडपून टाकिलें पाहिजे. एकदां कां त्यांनीं कायमचें वास्तव्य केलें तर मग त्यांना बाहेर खेंचून काढणें दुरापास्त आहे; तेव्हां नारायणरावांनीं या जन्मास येऊं

पहाणाऱ्या दुर्गुणांचें समूळ उच्चाटन करावें आणि स्वतःस लागलेला हा कलंक धुऊन टाकून निर्मळ व्हावें अशी बहुजनसमाजाच्या वतीनें आम्ही त्यांना विनंति करितो.

नारायणरावांनीं आत्तांपर्यंत एकंदर १४० भूमिका केलेल्या असून या भूमिकांसाठीं रंगपटांतून रंगभूमीवर झालेला आजपर्यंतचा त्यांचा प्रवास सुमारें ६५००० फूट झाला आहे व आजपर्यंत त्यांच्या भूमिका २२५००० लोकांनीं पाहिल्या आहेत; त्याचप्रमाणें हा काळपर्यंत त्यांचें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष-फोनोग्राफद्वारें-गाणें ऐकलेल्या लोकांची संख्या ३२९०६४१५ इतकी आहे. म्हणजे एकंदर महाराष्ट्राच्या लोकसंख्येहूनहि ही जास्त आहे.

---

# उपसंहार.

"I had no more loyal, no more respectful, no more believing, no more loving subject than henry Irving" *

*Edward VII*

प्लिनी नांवाचा एक ग्रंथकार कांहीं वर्षांपूर्वीं विलायतेंत होऊन गेला. तो आपल्या एका ग्रंथांत म्हणतो कीं 'तुमची कीर्ति अचल रहावी अशी जर तुमची इच्छा असेल तर आपल्या

---

* ब्रॅम स्टोकरकृत आयर्व्हिंगच्या चरित्रांतील हा उतारा आहे. यांतील उद्गार मरहूम सप्तम एडवर्ड बादशहा यांनीं प्रिन्स ऑफ वेल्स असतांना सु० आंग्लटन हेनरी आयर्हिंग याला सरची पदवी मिळाली त्या प्रसंगीं काढले होते.

चरित्रांत विशेष वर्णन करतां येण्यासारखी एखादी महत्वाची गोष्ट केली पाहिजे.' जगांतील सगळ्या चळवळी, घडामोडी, घटपटादि खटपटीं केवळ द्रव्य व कीर्ति या जोडीच्या प्राप्त्यर्थ चाललेल्या असतात. ' मरावें परी कीर्तिरूपें उरावें ' हा समर्थ संदेश तर सुप्रसिद्धच आहे; आणि आजपर्यंत जगांत होऊन गेलेल्या थोर विभूतींनीं कांहीं तरी विशेष कार्यें करूनच आपली कीर्ति अजरामर करून ठेवली आहे. साधुश्रेष्ठ कबीर महाराज म्हणतात ' सूरतसे कीरत बडी बिन पंख उडजांय । सूरत तो जाती रही कीरत कभी न जाय । असा कीर्तीचा महीमा आहे.

नारायणरावांनीं कीर्तीची हांव कधींच धरली नाहीं. त्यांनीं द्रव्याची चिंता कधींच बाळगली नाहीं. पण या सर्व गोष्टी ते पूर्ण लायक झाल्याबरोबर त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभ्या राहिल्या. हें त्यांच्या चरितातें फार बारकाईनें निरीक्षण करणारांस तेव्हांच समजून येईल. मनुष्य कोणतीहि गोष्ट करण्यास प्रथम लायक व्हावा लागतो. स्वताच्या लायकीखेरीज एखादी गोष्ट किंवा कार्य करण्यास तो धजेल तर त्याच्या पदरीं अपेशच येणार हें निश्चित समजावें. एक इंग्रजी म्हण आहे कीं, ' First Deserve and then Desire ' म्हणजे ' प्रथम लायक व्हा आणि मग इच्छा करा. ' पण **स्वामीरामतीर्थ** तर याच्याहि पलीकडे जाऊन सांगतात कीं, ' पहिल्यांदा लायक व्हा. म्हणजे मग तुम्हाला इच्छाही करण्याची मुळींच गरज नाहीं. जगांतील सर्व सुखें व प्रत्येक गोष्ट

मग तुमच्यापुढें सतत हात जोडून उभी राहील.' कितीतरी उपयुक्त उपदेश आहे हा! परंतु आमच्या सर्व चळवळी, आमचीं सर्व कार्यें, आमच्या सर्व आशा, महत्त्वाकांक्षा आमच्या नालायकीमुळें कशा विफल होत आहेत हें डोळ्यांना दिसत असून देखील आम्ही शुद्धीवर येत नाहीं आणि स्वतांच्या अंगीं लायकी आणून ती जगाच्या निदर्शनास आणीत नाहीं हें केवढें आश्चर्य आहे! कित्येक लोकांच्या नालायकीमुळें त्यांनीं आरंभलेलीं कामें यशस्वी न होतां त्यांना अपयशाचा खोल खड्डा पहाणें भाग पडलें. आमच्यापैकीं कित्येक स्वातंत्र्योत्सुक पण नालायक नटांनीं उत्तमोत्तम संस्थांची फाळणी करून बंगालची फाळणी करून जें पुण्य कर्झनसाहेबांनीं मिळवलें तेंच त्यांनीं मिळवलें आहे. कित्येक अविवेकी व आरंभशूर मंडळींनीं आपल्या लायकीच्या खोट्या भांडवलावर भिस्त ठेवून कार्यारंभ केला, पण पुढें अल्पावकाशांतच त्यांच्या लायकीच्या भ्रमाचा भोंपळा फुटल्याबरोबर त्यांची भयंकर दुर्दशा झाली.

आमच्या चरित्र पुरुषानें प्रथम स्वताःची लायकी जगजाहीर केली, व तो पूर्ण लायक झाल्याबरोबर त्याचे एका मागून एक सर्व मनोरथ पूर्ण झाले. नारायणराव आपलें प्रेम घेण्यास आतां खरोखर लायक झाले आहेत असें पहातांच महाराष्ट्रानें आपलें प्रेमाचें गांठोडें झटकन व बेगुमान त्यांच्या स्वाधीन केलें आणि म्हणूनच लोकाश्रय व राजाश्रय मिळवून ते आज आपली संस्था धैर्यानें, जोमानें उन्नतीच्या मार्गानें चालवीत आहेत.

५५/ ... नं. ... ता. ...

बालगंधर्वांवरील महाराष्ट्राचें प्रेम फारच उच्चदर्जाचें व नितांत आहे यांत मुळींच संशय नाहीं. मोठमोठी पंडीत व विद्वान् मंडळी आपलीं हजार कामें बाजूस ठेवून बालगंधर्वांचें सानिध्यसुख लाभावें ह्मणून यथामती झटत असतात; राष्ट्रीय उन्नतीसाठीं अवतरलेल्या वर्तमानपत्राचे विद्वान संपादक ' आवडती भेट ' ह्मणून महाराष्ट्रीयांस बालगंधर्वांचा सुंदर स्त्रीवेषांतील फोटो नजर करतात; आतां, या कृत्याबद्दल कित्येक अदूरदृष्टी व मत्सरी लोकांनीं कितीहि कावकाव केली तरी त्यांच्या ह्या बाह्यद्वेषावरून त्यांचें अंतःकरणहि तितकेंच मत्सरग्रस्त व द्वेषमलीन असेल असें मात्र कोणीही समजूं नये. कारण, या ' आवडत्या भेटी ' विषयीं निष्कारण कोलाहल करणाऱ्या महात्म्यांच्या घरीं जाऊन पहाल तर त्यांच्या कुलदेवतेच्या तसबिरी शेजारींच बालगंधर्वांची तसबीर उत्तम फ्रेम करून लटकावलेली आपणांस आढळून येईल. तेव्हां यावरून त्यांचा बहिर्द्वेष तितक्याच किंमतीचा असतो हें सिद्ध होतें. आतां, त्यांचा ( बालगंधर्वांचा ) खराखुरा द्वेष व मत्सर करणारे कांहीं हरींचे लाल नाट्यसृष्टींत आणि समाजांत आहेत; पण अशांची संख्या सहारा वाळवंटांतील एका सिकताकणाइतकी मोठी असल्यामुळें त्यांच्याकडे लक्षहि देण्याचें कारण नाहीं. बालगंधर्वांची मौल्यवान चरणधूली आपल्या घरीं पडून तें पावन व्हावें म्हणून कित्येकांनीं त्यांना भोजनास व पानसुपारीस पाचारण केलें आहे. कांहींकांनीं बालगंधर्वांचा फोटो आपल्या ऑफिसांत व कित्येक

विद्यार्थ्यांनीं आपल्या अभ्यासाच्या पुस्तकांत नित्यदर्शन घडावें म्हणून ठेवला आहे. कित्येक कॉलेज स्टुडंटस परीक्षा पसार होण्याच्या ऐवजीं कॉलेज क्वार्टर्समधील आपल्या रूमच्या खिडकींतून मात्र पसार होऊन मानापमानांतील भामिनी पहावयास धांवत जातात. आणि कॉलेजांतील अभ्यास जरी नीट पाठ झाला नाहीं; बेकन, मिल्टन पाठ करण्यांत जरी त्यांनीं पाठ दाखविली तरी बालगंधर्वांची मानापमान नाटकांतील एकून एक पद्यें त्यांना अगदीं मुखोद्गत असावयाचीं! ऋण काढून सण करण्याप्रमाणें कित्येक महाराष्ट्रीयांनीं शेजाऱ्यापाजाऱ्याजवळून पैसे उसने घेऊन बालगंधर्वांचें गायन श्रवण करण्यास कमी केलेलें नाहीं. कित्येकांना तर बालगंधर्वांचा क्षणिक सहवास म्हणजे कपिलाषष्टीचा मोठा अलभ्य लाभ वाटतो. इतकेंच नाहीं पण रा. बालगंधर्वांना आपल्या डोक्यावर चवढण्यास देखील महाराष्ट्रानें कमी केलेलें नाहीं. (वाचकांनीं गंधर्वकंपची आठवण करावी. किंबहुना, यावेळीं ती त्यांच्या डोक्यावर असेल सुद्धां.) सारांश; या एकंदर प्रकारावरून बालगंधर्वांवरील महाराष्ट्रीयांचें गाढ प्रेम आणि त्यांच्या गुणांची पारख तसेंच बालगंधर्वांसंबंधींची त्यांची सहानुभूति व अभिमान व्यक्त होतो असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

नारायणरावांच्याप्रमाणें सर्वांनाच गायनासारख्या मनोवेधक आणि चित्ताकर्षक गुणाची, संपत्तीची, अधिकाराची व मानमरातबांची अनुकूलता नसेल. सर्वांनाच या गोष्टी लाभणें अशक्य

आहे. पण त्यांच्या अंगचें सौजन्य, प्रेमळपणा, गोडभाषण, निरभिमानवृत्ती, सात्त्वीकपणा, निर्व्यसनीपणा, विनयादि सद्गुण प्रत्येकास आपल्या अंगीं आणतां येणें शक्य आहे. आणि आमच्या या चरित्रनायकाच्या निर्मळ चारित्र्यांतून समाजास मोठासा बोध घेण्यासारखें कांहींच नसलें तरी वरील त्यांचे सद्गुण अनुकरणीय आहेत व त्यांनीं ते अवश्य धारण केले पाहिजेत. आणि नाटकमंडळींतील मिजासखोर नटांनीं, गर्विष्ट मालकांनीं व समाजांतील ज्ञानलवदुर्विदग्ध अहंमन्यांनीं आमच्या चरित्र पुरुषाच्या अंगच्या वरील अमोलिक सद्गुणांचें अनुसरण करून स्वतःच्या कीर्तिक्षयास व प्रगतीरोधास कारणीभूत झालेल्या आपल्या दुर्गुणांचें निर्मूलन करून टाकल्यास त्यापासून त्यांचें व त्यांच्या देशाचें कल्याण होणार आहे; असो.

आतांपर्यंत आमच्या चरित्रनायकाच्या निर्मळ व स्पृहणीय चारित्र्याचें यथामती वर्णन केलें आहे. आणि तें करतांना ठिकठिकाणीं ज्या योग्य व आवश्यक दिसल्या अशा सूचना केवळ सद्धेतूनें केल्या आहेत. त्यांत कोणाला दुखवावें किंवा कोणाचा उपमर्द करावा ही मुळींच इच्छा नाहीं हें ध्यानांत ठेवावें. प्रस्तुत पुस्तकाचा नटांची व नाटकमंडळ्यांची सद्यः स्थिति पालटण्यास थोडाफार तरी उपयोग झाला तर त्याबद्दल चरित्र-कारास आपल्या श्रमाचें चीज झालें असें पाहून समाधान वाटेल.

ॐ शांतिः शांतिः शांतिः

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १२६०
REFBK-0001270